# गोदातीर समाचार

स्थापना-१९६२ 
६४

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

* वर्ष ६४ वे * अंक १७६ * नांदेड * बुधवार, दि. २ जुलै २०२५
* पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


## नांदेड शहर व जिल्ह्यात जोरदार पाऊस; जनजीवन विस्कळीत

**नांदेड (प्रतिनिधी)–** यंदाचा मृग नक्षत्र कोरडा गेला असला तरी जून महिन्याच्या सरतेशेवटी पावसाची सुरुवात झाली आहे. सोमवार, दि. ३० जून रोजी दिवसभरात कमी अधिक स्वरूपात पाऊस झाला. यानंतर सलग दुसऱ्या दिवशी १ जुलैच्या दुपारपासून नांदेड शहरासह जिल्ह्यात जोरदार पाऊस सुरू झाला आहे. यामुळे शेतकरी सुखावले आहेत. मात्र शहरातील जनजीवन विस्कळीत झाले होते.

यंदा पाऊस वेळेवर होईल, असे भाकित हवामान केंद्राकडून वर्तविण्यात आले होते. परंतु वातावरणाच्या बदलामुळे मृग नक्षत्र सुरू होऊन सुद्धा पावसाने हुलकावणी दिली होती. नांदेड जिल्ह्यात या नक्षत्रात पाऊस बरसलाच नाही. शेतकऱ्यांनी पेरणी करून पावसाची प्रतीक्षा केली. परंतु पाऊस पडलाच नव्हता. जून महिन्याच्या सरतेशेवटी म्हणजेच तब्बल १५ दिवसांनंतर अचानक पावसाने बरसायला सुरुवात केली. त्यामुळे खरीप हंगामातील पिकांना जीवदान मिळाले. शहरात दमट वातावरण निर्माण झाले होते, या पावसामुळे शहरात काहीसा गारवा निर्माण झाला.

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार मंगळवार, दि. १ जुलै रोजी नांदेड शहरात पावसाचे आगमन झाले. दोन दिवसांपासून पावसाची थोडीशी भुरभुर सुरू होती, परंतु चांगला मोठा पाऊस पडतच नव्हता. शेतकरीवर्ग तथा नांदेडवासिय आभाळाकडे डोळे लावून बसले होते. दररोज काळेकुट्ट ढग यायचे व वाऱ्याच्या वेगाने निघून जायचे, असा परिपाठ कित्येक दिवस सुरू होता. कधी सिडको येथे हलक्या स्वरूपाचा पाऊस असायचा तर आयटीआय, राज कॉर्नरकडे पावसाचा टिपूस सुध्दा नसायचा. ही आंधळी कोशिंबीर पाऊस खेळत होता. परंतु १ जुलै रोजी आभाळ काळेकुट्ट झाले अन् दुपारी जोरदार पाऊस बरसला. सायंकाळी उशीरापर्यंत पाऊस सुरू होता.
















जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# धार्मिक उत्सवांची गर्दी; नियोजन अत्यावश्यक

पुरीच्या श्री गुंडीचा मंदिराजवळील रथयात्रा उत्सवाच्या दिवशी घडलेली चेंगराचेंगरी ही केवळ दुःखद घटना नाही, तर एक गोंधळलेल्या प्रशासनाचे कटू उदाहरण आहे. यात तीन भाविकांचा मृत्यू झाला, त्यात दोन महिलांचाही समावेश होता. ही घटना पुन्हा एकदा हेच अधोरेखित करते की, आपल्याकडे गर्दीच्या व्यवस्थापनात अजूनही पुरेसा बदल झालेला नाही. ही काही अपवादात्मक घटना नव्हे, तर अशा दुर्घटना वारंवार घडत आहेत आणि तरीही आपले प्रशासन, त्यातही धार्मिक उत्सवांचे आयोजन करणारे संस्थान, 'एकदा चुकलो, पुन्हा चुकणार नाही' या तत्वाशी सहसा बांधील दिसत नाहीत. भारतात मोठ्या प्रमाणावर श्रद्धाळू लोक धार्मिक स्थळांवर, यात्रा, पूजाअर्चा आणि महोत्सवांमध्ये गर्दी करतात. ही गर्दी केवळ देवदर्शनापुरती मर्यादित नसते, तर रोजच्या जीवनातली चिंता, संघर्ष आणि मानसिक तणाव दूर करण्याचा एक भावनिक प्रयत्न असतो. अशावेळी हजारोंच्या संख्येने जमलेली गर्दी संयमाने आणि सुरक्षिततेने हाताळणे हे केवळ प्रशासनाचे कर्तव्यच नाही, तर ते मानवी मूल्यांचाही भाग असायला हवा. पण दुर्दैव असे की, अनेक प्राणघातक दुर्घटना घडूनही यंत्रणा डोळे झाकूनच चालते. यामागे केवळ निष्काळजीपणा नाही, तर एकप्रकारची संवेदनशून्यता आहे. आपण एखादा मोठा उत्सव 'यशस्वीरीत्या पार पाडला' अशी छाप निर्माण करण्याच्या नादात, व्यवस्थापन आणि सुरक्षेच्या मूलभूत गरजांवर दुर्लक्ष करतो. कोणत्याही जीवितहानीसाठी प्रशासन जबाबदार धरले गेले पाहिजे, कारण त्याच्याकडे साधने असतात, अधिकार असतो आणि सर्वाधिक महत्त्वाचे म्हणजे, नियोजन करण्याची जबाबदारीही त्याच्यावरच असते. उदाहरणे भरपूर आहेत जसे मथुरेतील 'सत्संग'ला झालेली दुर्घटना, वैष्णो देवी यात्रा, गोदावरी नदीकाठचा 'पुष्करम' उत्सव, दतियातील रतनगड मंदिरातील नवरात्र उत्सव, पाटण्यात छठपूजेदरम्यान झालेले चेंगराचेंगरीचे प्रकार, हरिद्वार, सबरीमलाचे पुल्मेडू अपघात, उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील रामजानकी मंदिरातील दुर्घटना आणि अजून कितीतरी. ही सर्व उदाहरणे एक गोष्ट स्पष्ट करतात की, आपल्याकडे गटारांसारख्या आपत्तींच्या व्यवस्थापनात एक मूलभूत दोष आहे. मोठ्या दुर्घटनांनंतर सरकारकडून ठराविक पद्धत अनुसरली जाते. मृतांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई जाहीर करणे. यावेळी ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन माझी यांनी जिल्हाधिकाऱ्यांचा आणि पोलीस अधीक्षकाचा बदली आदेश दिला, तसेच एका डीसीपी आणि कमांडंटला निलंबित केले. पण एवढ्यावरच खरोखर जबाबदारी संपते का? दुर्घटना टाळता आली असती का? हा प्रश्न आपण दरवेळी विचारतो. पण उत्तर शोधण्याऐवजी जबाबदारी ढकलण्यात वेळ घालवतो. हेच कारण आहे की, भारतात गर्दीच्या चेंगराचेंगरीला 'मानवनिर्मित आपत्ती' मानले जाते. लाखो लोक एकाच जागी एकत्र जमा होणार असतील तर त्यांच्या आगमनापासून सुटण्यापर्यंत सर्व गोष्टींचे व्यवस्थित नियोजन हवे. आपत्ती व्यवस्थापन, प्राथमिक वैद्यकीय सुविधा, मार्गदर्शन करणारे स्वयंसेवक, सुस्पष्ट सूचना, सुरक्षा कर्मचारी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, ही सगळी साधनं आपण वापरू शकतो, पण त्यासाठी इच्छाशक्ती हवी. आपण असे अनेक मंत्र्यांचे किस्से ऐकले आहेत की जिथे एखाद्या अपघातानंतर त्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला. लालबहादूर शास्त्री यांचा रेल्वे अपघातानंतर दिलेला राजीनामा असो, किंवा माधवराव सिंधिया यांचा नागरी उड्डाण खात्याशी संबंधित दुर्घटनेनंतरचा राजीनामा. या उदाहरणांमधून आपल्याला लोकशाहीतील नीतिमूल्यांची आठवण होते. पण आजची स्थिती निराशाजनक आहे. मंत्रीपद, प्रतिष्ठा आणि राजकीय खेळी यासाठी नैतिकतेला मागे टाकले जाते. या सगळ्याचा शेवट असा की, भाविकांच्या मृत्यूची जबाबदारी कोणी घेत नाही, केवळ सांत्वनपर शब्द, 'अतिविशाल गर्दी होती', 'आम्ही चौकशी सुरू केली आहे' अशा पोकळ प्रतिक्रिया आणि ढोंगी दुखवटा. आपण जर खरोखर धार्मिक भावना जपणार असू, तर प्रत्येक भक्ताचे जीवनही तितक्याच श्रद्धेने जपले पाहिजे. धार्मिक उत्सव म्हणजे श्रद्धेचा जिवंत उत्सव असतो. तो मृत्यूचा फटका ठरू नये, यासाठी सर्वांनीच सजग राहायला हवे. पण मुख्य जबाबदारी आहे ती सरकारची. कारण नियोजन हे श्रद्धेवर नाही, प्रशासनावर अवलंबून असते. वेळ आली आहे की, अशा घटनांनंतर थांबून केवळ दुःख व्यक्त न करता, दीर्घकालीन उपाययोजना प्रत्यक्षात राबवण्यात याव्यात अन्यथा, श्रद्धाळूंच्या मृत्यूचा पाप त्यांच्या देवावर नव्हे, तर आपल्या समाजव्यवस्थेवर लागेल.

# आजही अपूर्ण आहे महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया



जगातील निम्मी लोकसंख्या स्त्रियांची असूनही पुरुषांच्या तुलनेत त्या दोन तृतीयांश काम करतात, तरीही एकूण उत्पन्नापैकी फक्त दहावा हिस्सा त्यांना मिळतो. स्त्रियांचे कामाचे तास पुरुषांपेक्षा जास्त असतात, कारण मुलांची काळजी ते घरगुती जबाबदाऱ्यांपर्यंतची सर्व जोखीम बहुतेक स्त्रियांवरच असते. जरी पुरुष आता घरकामांत मदत करू लागले असले, तरी त्यांची संख्या अजूनही फारच कमी आहे. याशिवाय, उत्पन्नार्जनातही स्त्रिया महत्त्वाची भूमिका बजावतात. तरीही, बहुसंख्य स्त्रियांना आजही कुपोषण आणि आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. विशेषत: ग्रामीण भागातील निरक्षर आणि अल्पशिक्षित स्त्रियांकडे वाचन-लेखनासाठी वेळ नसतो; ज्या थोड्याफार शिकलेल्या आहेत, त्यांच्याकडे सुविधांचा अभाव असतो. अशा परिस्थितीत स्त्रियांचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण हा आजही एक प्रमुख मुद्दा बनून राहिला आहे.

खरं तर, सक्षमीकरण हा आज विकासाच्या मुख्य प्रवाहातील एक खूप चर्चित शब्द आहे. ही एक अशी संकल्पना बनली आहे, जी केवळ व्यक्तिमत्त्वाच्या ओळखीपुरती मर्यादित नसून, व्यापक अर्थाने मानवी हक्क आणि सामाजिक न्यायाच्या विश्लेषणाशीही निगडित आहे. सक्षम व्यक्ती म्हणजे जीच्यात आत्मविश्वास आणि स्वाभिमानाची जाणीव असते, जीला तिच्या सामाजिक-राजकीय वातावरणाचे विश्लेषण करण्याची दृष्टी असते आणि जी आपल्या जीवनावर परिणाम करणाऱ्या निर्णयांमध्ये बदल घडवण्याची क्षमता ठेवते.

स्त्री सक्षमीकरण ही अशी प्रक्रिया आहे, ज्यामध्ये स्त्रिया घरगुती, सामाजिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या हक्कांना ओळखून, त्यांचा वापर करत जगण्यावर स्वतःचे नियंत्रण ठेवतात. सक्षमीकरण म्हणजे स्त्रिया वैयक्तिक निर्णय घेण्यास पूर्णपणे सक्षम असणे, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी होणे, तसेच स्वतःचे ध्येय ठरवून ते साध्य करण्यासाठी स्वतंत्र असणे. सक्षमीकरणाला सहा आयामांत विभागता येते बौद्धिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि कायदेशीर सक्षमीकरण.

बौद्धिक सक्षमीकरण म्हणजे स्त्रिया समाजातील त्यांच्या दुय्यम दर्जाची कारणे स्थूल आणि सूक्ष्म रूपात समजून घेणे. पण आजच्या परिस्थितीत बघितले तर, बौद्धिक सक्षमीकरणाची छायासुद्धा स्त्रियांच्या मोठ्या वर्गाला स्पर्श करू शकलेली नाही. आजही जुन्या परंपरा आणि मान्यता यांना न विचारता, न समजता त्या पाळल्या जात आहेत.

मानसिक सक्षमीकरण स्त्रियांमध्ये स्वतःची स्थिती सुधारण्याची भावना विकसित करते. याचा अर्थ असा की, त्यांच्यात हा विश्वास दृढ होतो की, बदलाच्या प्रयत्नांमध्ये त्या यशस्वी होऊ शकतात. यामुळे त्यांच्यात दृढता, आत्मविश्वास, निर्भयता आणि धैर्यसारख्या गुणांचा विकास होतो. पण मानसिक सक्षमीकरणही स्त्रियांच्या संदर्भात फारसे अर्थाचे राहिलेले नाही, कारण जेव्हा त्या स्वतःच्या स्थितीत बदलाची कल्पनाच करू शकत नाहीत, तेव्हा ती सुधारण्याचा प्रयत्न करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

आर्थिक सक्षमीकरण स्त्रियांना उत्पादकतेशी जोडून त्यांना काहीअंशी स्वावलंबी बनवते. मोठ्या संख्येने स्त्रिया उत्पादनक्षम होऊन उत्पन्न मिळवू लागल्या आहेत, पण त्यापैकी बहुतेकींना ते पैसा खर्च करण्याचा अधिकार नसतो. कारण त्या बौद्धिक आणि मानसिकदृष्ट्या स्वतंत्र झालेल्या नसतात आणि त्यांच्याकडे कायदेशीर माहितीचाही अभाव असतो. याखेरीज घर-कुटुंब आणि मुलांबाबतची जबाबदारी त्यांच्या निर्णयक्षमतेवर परिणाम करते. म्हणूनच, आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही त्या स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकत नाहीत.

सक्षमीकरण केवळ व्यक्तिगत जागृतीवर अवलंबून नसून, ते समूहाच्या जागृती आणि कृतीशीही निगडित आहे. पूर्वी राजकारणात स्त्रियांची संख्या नगण्य होती, पण आज परिस्थिती बदलली आहे. स्त्रिया आता राजकीय क्षेत्रात दिसू लागल्या आहेत. राजकारणातील ३३% आरक्षणाने स्त्रियांसाठी विकासाचा नवा मार्ग मोकळा केला आहे, मात्र एका सामान्य स्त्रीसाठी राजकारणात येणे आणि टिकून राहणे हे एक मोठे आव्हानच आहे. ग्रामीण भागात पाहिले तर, तेथील परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही, जिथे महिला सरपंचचा पती किंवा सासरा तिच्या सर्व कामकाजाची देखभाल करतो.

सामाजिक सक्षमीकरण म्हणजे समाजातील विविध वर्ग, संस्कृती आणि कामांमधील सत्तेविभागणीत बदल घडवणारी प्रक्रिया. पूर्वी स्त्रिया सामाजिक विकासाच्या पैलूंबद्दल अनभिज्ञ होत्या, पण आज परिस्थिती बदलली आहे. स्त्रिया समाजाच्या परिस्थितीवर नजर ठेवत आहेत आणि सामाजिक विकासाच्या संपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, केवळ स्त्रियांचा सहभागाने त्यांचे सक्षमीकरण शक्य नाही. पुरुषांनाही स्त्रियांच्या सामाजिक सक्षमीकरणात आपली भूमिका निश्चित करावी लागेल.

स्त्रियांच्या सुरक्षेसाठी देशात अनेक कायदे आहेत. तरीही, स्त्रियांची सुरक्षा हा आजही एक गंभीर मुद्दा आहे आणि चिंतेचा विषय बनून राहिला आहे. स्त्रियांवर घरगुती हिंसा, लैंगिक अत्याचार आणि सामाजिक छळ यांसारखे गुन्हे कमी होत नाहीत. असे का? यामागे अनेक कारणे आहेत. सर्वप्रथम, माहितीचा अभाव. ज्या स्त्रियांसाठी हे कायदे बनवले गेले, त्यांनाच याची माहिती नसते. ज्यांना माहिती आहे, त्यांनाही याचा फायदा कसा मिळवायचा याची जाण नसते. दुसरे कारण म्हणजे, स्त्रियांच्या हितासाठी बनवलेल्या कायद्यांमध्येच अशा पळवाटा आहेत, ज्यामुळे गुन्हेगारांना वेळेवर शिक्षा मिळत नाही किंवा संशयाच्या फायद्यात सोडले जातात. तिसरे कारण म्हणजे पुरुषप्रधान समाजाची मानसिकता, जिथे आजही पीडित स्त्रीच्याच पहिल्या दृष्टीने 'दोष' शोधला जातो. याखेरीज, स्त्रिया मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या सक्षम नसल्यामुळे, त्यांच्यात धैर्य, आत्मविश्वास आणि दृढतेसारख्या गुणांचा अभास असतो. आवश्यकता आहे ती समाजाच्या त्या मानसिकतेत बदल घडवण्याची, जिथे स्त्रियांना आजही केवळ एक वस्तू किंवा कुटुंबाच्या इज्जत म्हणून पाहिले जाते, व्यक्ती म्हणून नाही.

एकंदरीत, स्त्रियांचे सक्षमीकरण हे अजून पूर्णत्वास आलेले नाही. या दिशेने अजून बरेच काही करण्याचे बाकी आहे. विशेषत: स्त्रियांना मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या जागृत आणि सक्षम बनवण्याची अत्यंत गरज आहे. साक्षरता हे स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी सर्वात महत्त्वाचे साधन मानले गेले आहे, जे त्यांना ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वासाद्वारे विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडते. जर समाजातील प्रत्येक स्त्री साक्षर झाली, तर त्यांना सक्ष३म बनवणे आपल्यासाठी सोपे जाईल.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# सरकारी नोकरी महत्त्वाची की, उद्योग?




अलिकडील काळात लोकं ओरडत आहेत. ओरडत आहेत की नीटमध्ये घोटाळा झाला. ज्यातून काही राज्याच्या मुलांना पैकीच्या पैकीच गुण मिळाले. ते सगळं सेटींग होतं आणि ज्यांनी अभ्यास केला. ते मात्र मागं पडले. त्यात लोकांनी आवाज उचलला व नीटच्या त्या परीक्षेवरच आक्षेप घेत ती परीक्षा रद्द झाली. यात जे इमानदारीनं मेहनत करुन पास झाले. त्यांची मेहनत व्यर्थ गेली. तसेच ते द्वितीय प्रयत्नात पास होतीलच, याची शाश्वती नाही. हाच शिक्षणात होत असलेला खेळखंडोबा लक्षात घेवून शिक्षण घेवून नोकरी मिळवू नये तर एखादा उद्योग उभारावा. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही.

नीट, एडीए, जेईई, एम एस सी आय टी आणि इतर तत्सम स्पर्धा परीक्षा. त्या कशासाठी? तर त्या दिल्यानं सरकारी नोकरी लागते व ज्याला सरकारी नोकरी लागली, तो राजा बनतो किंवा त्याचं संपुर्ण आयुष्य राजागत सुखात जात असतं. त्यासाठी लोकं कितीतरी महागड्या शिकवण्या लावून देत असतात. कारण अशी प्रथा आहे की तशा स्वरुपाच्या शिकवण्या लावल्याशिवाय मुलं पासच होत नाहीत वा स्पर्धा परीक्षेत उच्च स्थानावर जात नाहीत.

सरकारी नोकरी. म्हणतात की सरकारी नोकरी लागली की बस लोकांची चांदी चांदी असते. एकदा का सरकारी नोकरी लागली की व्यक्ती राजाच बनून जातो. त्याला जास्त शहाणपण येतं व तो मन मानेल तसा वागू शकतो.

लोकांचा सरकारी नोकरीवर असलेल्या लोकांबाबत असा समज. शिवाय त्या सरकारी नोकरीवर असलेल्या लोकांना अपार असं सुख असतं हा दुसरा समज. त्याला कोणीच त्रास देत नाही हा तिसरा समज. तसंच त्याला कोणतीही कामं करावी लागत नाहीत हा चवथा समज आणि सर्वात मोठा समज म्हणजे तो कुणाचा गुलाम राहात नाही तर असा समज.

सरकारी नोकरी तशी चांगलीच आहे. जर वरचा अधिकारी चांगल्या स्वभावाचा असला तर. तो अधिकारी समजून घेणारा, सुशील विचारांचा. मृदू भाषी, आपली स्वतः ची अक्कल लावणारा. प्रेमानं कोणत्याही गोष्टी समजून सांगणारा त्यातच न रागावणारा असावा. तसाच कोणत्याही गोष्टीचे दडपण न बाळगणारा असावा. त्याचेमध्ये राग, द्वेष लोभ, मोह यासारखे दुर्गुण नसावे. व्यतिरीक्त कोणताच स्वार्थ नसावा त्याचे मनात. तोच व्यक्ती अधिकारपदावर शोभून शकतो. शिवाय असे दुर्गुण असल्यास त्यानं ते तत्काळ आपल्या अंगातून काढून टाकायला हवेत. परंतु आजचे अधिकारी तशा स्वभावाचे नसतात. त्यामुळं त्याच्या आधिनस्थ असलेल्या करामचाऱ्यांना अतिशय त्रास होत असतो. शिवाय गुलामागत जीवन काढावं लागतं.

सरकारी नोकरी ही नावालाच सुखी असणारी नोकरी आहे. तिची अवस्था जावे त्याच्या वंशा अशी आहे. त्या ठिकाणी असणाऱ्या व्यक्तीला भयंकर पीडा सहन करावी लागते. शिवाय काही बोलून त्रास व्यक्तही करता येत नाही. काही बोलून मन मोकळे करायचे झाल्यास आणि तसं केल्यास लोकं त्यांची टर उडवतात. म्हणतात की आम्हाला शिकवू नका. आम्हाला माहीत आहे सरकारी नोकरी करणारे कसे असतात ते. त्यांच्यापैकी काही ऑफिसमध्ये खुर्च्या तोडत बसलेले असतात. त्यांचा दिवस रात्रीला उगवतो. ते रात्रीच बसतात कामं करायला. दिवसभर बरेचसे हिंडत असतात. कोणीच जागेवर सापडत नाहीत. परंतु हे जरी खरं असलं तरी कोणतंही काम करतांना मन लावून काम करावं लागतं. नाहीतर आकडे चुकतात. म्हणूनच रात्रीला कामं चालतात. कारण रात्री येणाऱ्या जाणाऱ्यांची गर्दी कमी असते व काम करण्यात व्यत्यय वा अडथडा येत नाही. म्हणूनच रात्रीला कामं. कधीकधी घरीही फायली आणून रात्रीचा दिवस एक करुन कामं केली जातात. कधीकधी अशी कामं केल्यानं डोकं दुखतं. हे डोकं सतत दुखत असल्यानं डोकेदुखीचा त्रास उद्भवतो. त्यातच बरेचसे सरकारी कर्मचारी हे दुर्धर आजाराचे शिकार ठरतात. दुसरं आजाराचं कारण म्हणजे सतत काम करीत असल्यानं जे काही त्याच्यातील षडरिपू अंतर्मनातून बाहेर पडतात. त्यातूनही आजार उत्पन्न होवू शकतात. शिवाय तसेच काही आजार हे वरीष्ठ अधिकारीवर्ग त्यांना देत असलेल्या त्रासातून वा गुलामागत वागणूक देण्यातून उद्भवत असतात.

सरकारी नोकरी....सर्व लोकं आजच्या काळात सरकारी नोकरी मिळावी म्हणून उच्च शिक्षण घेत असतात. त्यांना वाटत असते की सरकारी नोकरी लागावी. त्यासाठी ते स्पर्धा परीक्षाही देत असतात आणि त्या परीक्षेत चांगल्या गुणांकनानं पास व्हावं व मी झालो पाहिजे. यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असतात नव्हे तर परीक्षा देत असतात. त्यातच ती परीक्षा झाली व ते स्पर्धक चांगल्या गुणानं पास झाले की बस. नोकरी लागत असते व नोकरी कोणती असते तर ती सरकारी.

ती सरकारी नोकरी. ती सरकारी नोकरी जर राजागत असली तर संपुर्ण आयुष्य अगदी सुखात जातं. जर त्या,त्या कर्मचाऱ्यांचा तो तो अधिकारी चांगला असला तर.......
तो जर चांगला नसेल तर त्या कर्मचाऱ्यांला गुलामागत आयुष्य काढावंच लागत नाही. परंतु अशा प्रकारचे अधिकारीही नसतात आणि आजच्या काळातील सरकारी नोकरी ही राजागत सुखमयही नसते. कारण जे अधिकारी त्यांच्या कर्मचाऱ्यांना त्रास देत असतात. त्या अधिकाऱ्यांनाही त्रास देणारे त्यांच्या वरचे उच्चपदस्थ मंडळी असतात. जे शिकलेले तर नसतात. परंतु केवळ पैशाच्या भरवशावर त्या अधिकाऱ्यांवर दबाव आणत असतात. त्यामुळंच त्यांना गुलामागत कार्य करावं लागतं. ती त्रास देणारी मंडळी असतात, ज्यांना आमदार, खासदार म्हणतात. तसंच अशा आमदार खासदारांवर उद्योगपतींचा दबाव असतो. कारण तीच मंडळी असे आम दार, खासदार निवडून यावेत. म्हणून पैसा लावत असतात.

सरकारी नोकरी ही अतिशय मेहनतीनंतर मिळत असते. ती कोणालाही मिळत नाही. त्यासाठी स्पर्धा परीक्षा आणि इतर बरेच वशिले लागतात. त्यातच ती मिळाली तरी वागणूक मात्र गुलामागत. त्यापेक्षा एखादा लहानसा उद्योग करणारा बरा की जो न शिकूनही सरकारी कर्मचाऱ्याएवढेच वेतन कमवतोय. परंतु कोणाची ठसन ऐकत नाही. अशा व्यक्तीला कोणी वेडे वाकडे बोलल्यास त्यांना वेळप्रसंगी त्यांची जागाही दाखवून देत असतो. एवढी ताकद त्यांच्यात असते. तो व्यक्ती शिकलेला नसला तरी स्वतंत्र्य असतो आणि सरकारी नोकरीवर असलेला व्यक्ती उच्च शिक्षीत असला आणि गुलाम जरी नसला तरी त्याला गुलामागत वागावं लागतं. नाहीतर नोकरीवरुन हात धुवावं लागतं. यातून असं दिसतं की एखादा लहानसा उद्योग बरा. कारण त्या उद्योगात तेवढा पैसा लागत नसते. फक्त थोडासा अनुभव हवा असतो. तो अनुभव कालांतरानं मिळतोच. त्यासाठी जास्तची मेहनतही करावी लागत नाही. अर्थात स्पर्धा परीक्षा द्याव्या लागत नाहीत. शिवाय स्पर्धा परीक्षा पास होण्यासाठी खाजगी शिकवण्या लावण्यासाठी जास्तचा पैसा खर्च करावा लागत नाही. शिक्षणालाही तेवढा खर्च होत नाही.

विशेष सांगायचं झाल्यास आजच्या काळातील लोकांनी जास्त शिक्षण घेतलं नाही तरी चालेल. कारण आजच्या काळात जास्तीचं शिक्षण हे आदर्श गुलाम निर्माण करणारं शिक्षण आहे. असं जास्तीचं शिक्षण घेण्याऐवजी लोकांनी एखाद्या उद्योगाचं शिक्षण घ्यावं. एखादा लहानसा उद्योग उभारावा. तो वाढवत वाढवत न्यावा व त्याच उद्योगात देशातील तंत्रज्ञ वा उच्चशिक्षित लोकं नोकरीवर नियुक्त करावेत. तसेच त्यांनी समाजात आदर्श निर्माण करावा की शिक्षण हे नोकरी करण्यासाठी शिकू नये तर स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी शिकावे. तसंच स्वतः आत्मनिर्भर व्हावे कारण शिक्षण हे गुलामी करण्यासाठी नाही तर ते सुधारण्यासाठी आहे. आपली अवस्था बदलविण्यासाठी आहे. विशेष महत्वपुर्ण बाब ही की शिक्षणातून माणूस बनतो. पशू नाही. यासाठीच शिक्षण घेवून उद्योग उभारणे महत्वाचे व्यतिरीक्त शिक्षण घेवून सरकारी नोकरी मिळविणे महत्वाचे नाही. ज्यातून देशाची प्रगती होवू शकेल. देश सुजलाम सुफलाम होवू शकेल व देशाला महासत्ताही बनवता येवू शकेल. हे तेवढंच खरं.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# वर्षा सहलीचा आनंद लुटा, पण...

राज्यात सर्वदूर पाऊस पडत आहे. काही ठिकाणी संततधार तर काही ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळत आहे त्यामुळे वातावरण प्रफुल्लित झाले असून परिसर हिरवाईने नटला आहे. नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तलाव विहिरीही भरल्या आहेत. धबधबे कोसळत आहेत. शेतशिवाराने हिरवा शालू नेसल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. डोंगर दऱ्यातून फेसळणारे धबधबे अनेकांना आकर्षित करत आहेत. विशेषतः तरुणांना या निसर्ग सौंदर्याचे आकर्षण जास्त आहे. त्यातही शहरात राहणाऱ्या वर्गाला निसर्गाचे जास्त कौतुक असते कारण त्यांना निसर्गाचा जास्त सहवास लाभत नसतो. अशी मंडळी निसर्गाची नवलाई अनुभवायला पावसाळ्यात आवर्जून घराबाहेर पडतात. वर्षा सहलीचे आयोजन करतात.

वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेत असताना काही पर्यटकांना उत्साहाचे भान राहत नाही. विशेषतः तरुण वर्ग अतिउत्साहाच्या भरात नको ते धाडस करतात आणि त्यातून एखादी मोठी दुर्घटना घडते. अशीच एक मोठी दुर्घटना मागील वर्षी लोणावळ्यात घडली होती. या दुर्घटनेचा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. लोणावळ्यात वर्षा सहलीसाठी आलेल्या अन्सारी कुटुंबातील नऊ सदस्य लोणावळा धरणाच्या पाठीमागे असणाऱ्या बुशी धरणावर वर्षा विहाराचा आनंद घेण्यासाठी गेले होते. मात्र पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने अन्सारी कुटुंबातील पाच जण वाहून गेले त्यात लहान मुले व महिलांचा देखील समावेश आहे. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळत असतानाच ताम्हिणी घाटातील प्लस व्हॅलीतील नदीत एका तरुणाने रील बनवण्यासाठी उडी मारली त्यात तो तरुण वाहून गेला अर्थात अशी दुर्घटना घडल्याची ती पहिली वेळ नव्हती मागीलवर्षीच खालापूरच्या साई बंधाऱ्यात पोहण्यासाठी गेलेल्या चार विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला होता.

दोन वर्षापूर्वी तर अशा अनेक दुर्घटना घडल्या होत्या. २०२३ साली चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील घोडझरी सिंचन तलावात बुडून चार तरुण मरण पावले होते. त्यातला एक तरुण सेल्फी काढण्याच्या नादात तलावात घसरला त्याला वाचवण्याच्या नादात पाण्यात उतरलेल्या इतर तीन तरुणांना देखील जलसमाधी मिळाली. पावसाळ्यात अशाप्रकारच्या दुर्घटना सातत्याने घडतात. याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि यापुढेही घडणार आहेत कारण वर्षा सहलीसाठी आलेले पर्यटक शिस्तीचे पालन न करता नको ते धाडस करतात विशेषतः तरुण वर्ग सेल्फी काढताना, रिल बनवताना स्वतःचा जीव धोक्यात घालतात. वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेत असताना काही गोष्टींची खबरदारी घेण्याची गरज आहे.

सध्या कुठेही गेल्यावर सेल्फी घेणे, व्हीडीओ बनवले, रील बनवणे, फेसबूक लाईव्ह करणे हा ट्रेंड झाला आहे. या ट्रेंडच्या नावाखाली अनेकदा उंच डोंगरावरुन, घाट माथ्यावरून, धबधब्याच्या टोकावरून, चारचाकी गाडीच्या टफावरून किंवा खिडकीतून तोंड बाहेर काढून, दुचाकी वरून स्टंट करुन व्हिडीओ बनवले जातात. सेल्फी काढले जातात, रिल बनवले जातात मात्र पावसाळ्याच्या दिवसात हे प्रकार जीवावर बेतू शकतात. लाईक, शेअर आणि कमेंटच्या नादात तरुणवर्ग हे धाडस करतात मात्र हेच धाडस मोठ्या दुर्घटनेस निमंत्रण देणारे ठरते. पावसाळ्यात रस्ते अधिक घसरट झालेले असतात. खड्डयांमध्ये पाणी साचल्यामुळे खड्डा किती मोठा आहे याचा नेमका अंदाज येत नाही. काहीतरी थ्रिलिंग करण्याच्या नादात शरीराला इजा करून घेणे योग्य नाही.

नदी, तलाव, धरणे, धबधबे याठिकाणी सहलीस गेल्यावर तर अधिक दक्ष राहावे लागतात कारण तिथे एखादी छोटी चूकही जीवघेणी ठरु शकते. नदी, तलाव, धरण, समुद्र या ठिकाणी पोहण्यास गेलेले तरुण बुडून मरण पावल्याच्या घटना याआधी अनेकदा घडल्या आहेत. खरंतर याबाबतीत पर्यटकांनी स्वतःच काळजी घेतली पाहिजे पण उत्साहाच्या भरात अनेकांना त्याचे भान राहत नाही म्हणून पर्यटनस्थळांच्या व्यवस्थापनाने याबाबतीत काळजी घेतली पाहिजे. सावधानतेच्या सूचना ठळकपणे लिहिल्या पाहिजेत. पाण्याची पातळी किती असल्यास कोणत्या मर्यादेच्या पुढे जाणे धोक्याचे आहे, याबाबत संबंधितांना इशारा दिला पाहिजे. धबधबे पाहण्यास गेलेल्या पर्यटकांना तर तशा सूचना देण्याची सक्त गरज असते. अशा ठिकाणी मुसळधार पावसात जाणे तर चुकीचेच असते. त्याचप्रमाणे गड, किल्ले, डोंगरमाथ्यावर भटकताना देखील भान ठेवणे तितकेच गरजेचे असते. अशा ठिकाणी जोराचा पाऊस आला तर कोणती खबरदारी घ्यावी तसेच अशावेळी कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ नये याची कोणतीही तजवीज केलेली नसते. त्यात काही महाभाग अशा ठिकाणी मद्यपान करून पर्यटनाला जातात. तरुणांनी हे कटाक्षाने टाळले पाहिजे. पर्यटकांनी स्वतःची व स्वतः बरोबर आलेल्यांचीही काळजी घेतली पाहिजे. वर्षा सहलीचा मनमुराद आनंद लुटा, मजा करा पण ही मजा जीवावर बेतणार नाही याचीही काळजी घ्या.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# बेरोजगारांच्या मेळाव्यात २७५ उमेदवारांची प्राथमिक निवड

- जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे आयोजन
- रोजगार मेळाव्यात १६ कंपन्यांचा १ हजार ५१३ रिक्तपदांसाठी सहभाग




**नांदेड (प्रतिनिधी)–** युवक- युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने शुक्रवार २७ जून रोजी श्री गुरूगोविंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदेड येथे पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा पार पडला. या रोजगार मेळाव्यात २७५ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द उद्योजक अभिजीत रेणापूरकर तर अध्यक्ष आदित्य मोटर्सचे उद्योजक अरूणजी फाजगे हे होते. जिवन हे एक शर्यत आहे. या शर्यतीमधुन अनेक गोष्टी बदल होतात. इथं जी संधी उपलब्ध करून दिली त्या संधीचा फायदा सर्वांनी घ्यावा, असे मार्गदर्शन उद्योजक अभिजीत रेणापूरकर यांनी विद्यार्थ्यांना केले. तसेच शिक्षण घेत असताना गुरूजनांचा विचार करा, समाजात वागताना आईवडीलांकडे बघा, संधीच सोन करा असा संदेश आदित्य मोटर्सचे उद्योजक अरूणजी फाजगे यांनी दिला. विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य विकसित करावे. सध्या या जगात कौशल्यालाच मागणी आहे. या आधुनिक जगात कौशल्य नसल्यास जीवन जगणे कठीण आहे असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त डॉ. रा.म.कोल्हे यांनी केले.

या मेळाव्यामध्ये एकूण १६ कंपन्यांनी १,५१३ रिक्तपदांसाठी सहभाग नोंदविला होता. तर एकूण ५६० उमेदवार उपस्थीत होते यामधून २७५ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली, अशी माहिती प्रसिध्दीपत्रकाद्वारे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राने दिली आहे.

## थोडक्यात...

### धाराशीव येथे १९ व २० जुलै रोजी ग्राहक पंचायतचे अधिवेशन

**नांदेड (प्रतिनिधी)–** ग्राहक पंचायत महाराष्ट्र संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन दि. १९ व २० जुलै रोजी धाराशिव येथे होणार आहे. यानिमित्त राज्याध्यक्ष डॉ.विजय लाड यांच्या अध्यक्षतेखाली धाराशीव येथे आढावा बैठक पार पडली. या बैठकीत आगामी अधिवेशनाच्या नियोजनासह व्यवस्थेसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी राज्य संघटक सर्जेराव जाधव, राज्य सहसंघटक मेधाताई कुलकर्णी, मराठवाडा विभाग संघटक हेमंत वडने, जिल्हाध्यक्ष अजित बागडे, लातूर जिल्हाध्यक्ष प्रल्हाद तिवारी, जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद कांबळे, जिल्हा सचिव आशिष बाबर, संघटक रवी पिसे, सहसंघटक विशाल शिंदे, शरद वडगावकर यांच्यासह राज्यभरातील पदाधिकारी उपस्थित होते.

### फुल विक्रेत्याला बेदम मारहाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील शास्त्रीनगर येथे अज्ञात चार आरोपींनी अज्ञात कारणावरून फुल विक्रेत्यास व त्याच्या साथीदारास शिवीगाळ करीत बेदम मारहाण केली. त्यात ते गंभीर जखमी झाले. शहरातील शास्त्रीनगर भागात खंडेलवाल स्वीट मार्टसमोर चौफाळा येथील रहिवासी फुल विक्रेते मोहम्मद मुजमीलोदिन मोहम्मद हबीबुद्दीन व त्यांचा एक साथीदार २९ जून रोजी उभे होते. तितक्यात तेथे अज्ञात चार आरोपी आले. आरोपी व फुल व्यापारी यांच्यामध्ये वाद निर्माण झाला. या वादाचे रूपांतर हाणामारी मध्ये होऊन आरोपींनी लोखंडी रॉड व दगडाने त्यांना बेदम मारहाण केली. त्यात ते गंभीर जखमी झाले. याप्रकरणी इतवारा ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गायकवाड करीत आहेत.

# राज्यात बंदी असलेला चार टन मांगुर मासा जप्त

## मांडवी पोलिसांची कारवाई, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल



**नांदेड (प्रतिनिधी) –** राज्यात विक्री व वाहतुकीसाठी प्रतिबंधित असलेला चार टन मांगुर मासा छुप्या मार्गाने तेलंगणात नेण्यात येत होता. याची माहिती मिळताच मांडवीचे ठाणेदार गंगाधर गायकवाड यांनी आपल्या पथकासह सापळा रचून मांगुर माशाची वाहतूक करणारा ट्रक पकडला. यावेळी यूपीचे दोन आणि कर्नाटकाचा एक अशा तिघांविरुद्ध मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई २९ जून रोजी पहाटे पाचच्या सुमारास उनकेश्वर नाका रस्त्यावर करण्यात आली.

मांडवी येथील सहायक पोलीस निरीक्षक गंगाधर गायकवाड यांनी आपले सहकारी पोलीस उपनिरीक्षक मेश्राम, हवालदार गुव्हाळे, अंमलदार कोन्डमवार, कांबळे, मालाबाई कनाके, डांगे आणि खाकरे हे गस्तीवर होते. दरम्यान, यांना पोलीस स्टेशन हद्दीत नाकाबंदी करीत असतांना उनकेश्वर नाका, रोडवर अवैध मत्स्य वाहतूक होत माहिती मिळाली. त्यावरुन सदर ठिकाणी जावून पाहणी केली असता तेथे एक आयचर कंपनीच्या वाहनात (केए-५०/बी२१४१ किंमत १५ लाख रुपये) चार टन मांगुर मासे आढळून आले. प्रति किलो ८० रुपये प्रमाणे ३ लाख २० हजार रुपयांची हे मासे आढळले. पोलिसांनी वाहनासह मांगुर मासे असा १८ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईची माहिती नांदेड येथील सहाय्यक मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी काशिनाथ बडेहवेली यांना देण्यात आली.

त्यानंतर बडेहवेली यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला व त्यानंतर शासकीय पंचा समक्ष जप्त केलेले मासे नष्ट केले. मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी बडेहवेली यांच्या फिर्यादीवरून चालक कमलकुमार राजेंद्रप्रसाद द्विवेदी (वय ३३ राहणार फत्तेपूर मुसानगर उत्तर प्रदेश), संतोष दयाराम यादव (वय ४० राहणार संधी पसायन उत्तर प्रदेश) आणि कर्नाटक राज्यातील टिपू नगरचा अफजल पाशा ताज पाशा (वय ३४) या तिघांविरुद्ध मांडवी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कामगिरी केल्याबद्दल पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराव धरणे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी रामकृष्ण मळघणे यांनी मांडवी पोलिसांचे कौतूक केले आहे.

# आषाढीनिमित्त तीन विशेष रेल्वे धावणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने देखील पंढरपूर आषाढी एकादशीनिमित्त दि. ५ जुलैपासून ३ विशेष रेल्वेगाड्या सोडण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती जनसंपर्क विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल-रुखुमाईच्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविक पंढरपूरला जात असतात. यावर्षी सुध्दा राज्यभरातून पायी दिंड्या पंढरपूरला रवाना झाल्या आहेत. दि. ६ जुलै रोजी आषाढी एकादशी साजरी होत आहे. या पार्श्वभूमीवर महामंडळाने एसटीने जादा बसगाड्यांची सुविधा केली आहे. दमरेच्या नांदेड रेल्वे प्रशासनाने देखील दरवर्षीप्रमाणे भाविकांच्या सोयीसाठी विशेष रेल्वेगाडधा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

शनिवार दि. ५ जुलै रोजी नगरसोल-मिरज- नगरसोल गाडी ०७५१५ ही रेल्वे सायंकाळी ७ वाजता नगरसोलहून सुटणार आहे. रोटेगाव, लासूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, बार्शी टाऊन, धाराशिव, कुर्डूवाडी आणि पंढरपूर अशी धावणार आहे. परतीच्या परतीच्या प्रवासात याच मार्गे दि. ६ जुलै रोजी पंढरपूरहून सकाळी सायंकाळी ५.२५ वाजता सुटणार आहे.

गाडी क्रं. ०७५०५ ही अकोला- मिरज- अकोला विशेष रेल्वेगाडी दि. ५ जुलै रोजी अकोला स्टेशनवरून सकाळी ११ वाजता सुटणार आहे. वाशीम, हिंगोली, वसमत, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, पानगाव, लातूर रोड, उदगीर, भालकी, बिदर, झहिराबाद, विकाराबाद, तांदूर, सेरम, चित्तपूर बाडी, कलबुर्गी, सोलापूर, कुर्डूवाडी आणि पंढरपूर अशी धावणार आहे. परतीच्या प्रवासात ही रेल्वे दि.६ जुलै रोजी दुपारी २.१५ वाजता सुटणार आहे.

आदिलाबाद - पंढरपूर ही गाडी क्रं. ०७०५०१ विशेष रेल्वे दि. ५ जुलै रोजी सकाळी ९ वाजता आदिलाबाद येथून सुटणार आहे. पुढे किनवट, बोधडी, धानोरा, सहस्त्रकुंड हिमायतनगर, भोकर, मुदखेड, नांदेड, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर, धाराशिव, बार्शी, कुर्दुवाडी रेल्वेस्टेशनवरून थांबणार आहे. परतीच्या प्रवासात हीच रेल्वे दि. ६ जुलै रोजी रात्री ११ वाजता कुर्डूवाडी रेल्वेस्टेशनवरून सुटणार आहे. भाविकांनी या विशेष रेल्वेगाड्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन नांदेड रेल्वे विभागाने केले आहे.

# नांदेड पोलीस दलातील सहा अधिकारी, सात ग्रेड उपनिरीक्षक, १५ अंमलदार व दोन मंत्रालयीन कर्मचारी सेवानिवृत्त



**नांदेड (प्रतिनिधी) –** जिल्हा पोलीस दलातील पोलीस अधिकारी ६, ग्रेड पोलीस उप निरीक्षक ७, पोलीस अंमलदार १५ व २ मंत्रालयीन कर्मचारी असे ३० अधिकारी व अंमलदार हे नियत वयोमानानुसार सोमवारी (दि.३) सेवानिवृत्त झाले आहेत. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, पोलीस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप यांच्या हस्ते सर्व सेवानिवृत्तांचा सत्कार करून निरोप देण्यात आला. यावेळी सर्व सेवानिवृतांनी आपल्या कुटूंबास वेळ द्यावा आणि आरोग्यांची काळजी घेवून सुखी आणि आनंदी जीवन जगण्याचा सल्ला पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिला.

सदर कार्यक्रम मंथन हॉल मध्ये पार पडला. या समारंभास पोलीस कल्याणचे पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार, जनसंपर्क अधिकारी तथा पोलीस उपनिरीक्षक जळबा गायकवाड यांच्यासह अनेक पोलीस अधिकारी व अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रूक्मीण कानगुले यांनी केले. ग्रेड पोलीस उपनिरीक्षक सुर्यभान कागणे, अंमलदार मारोती कांबळे, सविता भिमलवाड यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

सहाय्यक पोलीस निरीक्षक रमाकांत हणमंतराव नागरगोजे, पोलीस उपनिरीक्षक बाबु रघूनाथ हिंगमीरे, जम्मुखों आबियाखॉन पठाण, शेषेराव विठ्ठलराव यणगंटे, प्रकाश गणपतराव आवडे, किशन शामा आडे, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक गोंविद संभाजी केंद्रे, सदाशिव यशवंतराव उबाळे, शेख शादुल शेख लाल, मधुकर व्यंकटराव शिंदे, बालाजी शिवदास काळेवाड, चालकग्रेड पोलीस उपनिरीक्षक लतीफोद्दीन मो. मोहीयोद्दीन, मोईनोद्दीन निझामोद्दीन शेख, सहायक पोलीस उपनिरीक्षक खामराव शामराव वानखेडे, वैजनाथ दादाराव काळे, संजय विश्वनाथ वाठोरे, संभा बळीराम कदम, सुधाकर लक्ष्मणराव कदम, पोलीस हवालदार बिरेंद्रसिंघ आशासिंघ बुंगई, पुंडलीक पुंजाजी बोंडलेवाड, बापुराव मेघाजी आडे, तानाजी व्यंकटराव मुळके, भुजंग नारायण खेडकर, बळीराम मालु धुमाळे, रूपसिंग पांडु जाधव, राजु धनवु शाहु, प्रल्हाद मनु आडे, विष्णु शंकर डहाळे, बालाजी लक्ष्मणराव चिटलवाड, कार्यालय अधिक्षक सुधाकर कोंडीबा घोडजकर यांनी सेवानिवृत्ती निमित्त नांदेड पोलस दलाच्यावतीने निरोप देण्यात आला.

## मराठवाडा भूषण पुरस्काराने बंटी लांडगे सन्मानित



**नांदेड (प्रतिनिधी) –** राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष आनंद (बंटी) लांडगे यांना राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठाण यांच्यावतीने दिला जाणारा राजर्षी शाहू मराठवाडा भूषण पुरस्कार ज्येष्ठ साहित्यीक देवीदास फुलारी यांच्या हस्ते देऊन सन्मानीत करण्यात आले.

राजर्षी शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्यावतीने दि. २९ जून रोजी हॉटेल विसावा येथे मराठवाडास्तरीय कवी संमेलन आणि पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन केले होते. या सोहळ्यात युवा नेते बंटी लांडगे यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक देवीदास फुलारी, एमजीएम पत्रकारिता महाविद्यालयाचे प्राचार्य तथा दै. लोकपत्रचे आवृत्ती संपादक डॉ. गणेश जोशी, साहित्यिक महेश मोरे, प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे सदस्य राजेश पावडे, संयोजक भैय्यासाहेब गोडबोले यांची उपस्थिती होती.

# 'यशवंत'मध्ये जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** यशवंत महाविद्यालयात एनसीसी विभागाच्या वतीने जागतिक अंमली पदार्थविरोधी दिन आणि 'स्त्री शक्ती' दिनानिमित्त विशेष सायबर क्राईम जनजागृती व स्त्री सक्षमीकरण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात नांदेडच्या सायबर शाखेचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, सहाय्यक पोलिस निरीक्षक दयानंद पाटील आणि पोलिस उपनिरीक्षक मारुती चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्हेगारी व त्यापासून संरक्षण यासंदर्भात मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात मोबाईल हॅकिंग, फोटो शेअरिंग, चुकीच्या लिंक्सवर क्लिक करणे, ओटीपी शेअरिंग, क्रेडिट कार्ड क्लोनिंग, डेटिंग ॲप्समधील फसवणूक, चाइल्ड पोर्नोग्राफी, डीपफेक व ए.आय.चा गैरवापर, सायबर दहशतवाद आणि धार्मिक द्वेषजन्य टिप्पण्यांपासून सावधगिरी बाळगण्यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

प्राचार्य डॉ. गणेश शिंदे, उपप्राचार्य प्रा.के.आर. रबडे, एनसीसीचे संचालक लेफ्टनंट प्रा. श्रीकांत सोमठाणकर आणि जीसीआय प्रा. प्रियांका प्रतापराव शिसोदिया यांचे योगदान लाभले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आणि एनसीसी कॅडेट्सनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी आपल्या शंका अधिकाऱ्यांना विचारून सायबर सुरक्षेची सखोल माहिती मिळवली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सायबर सजगता, मानसिक आरोग्याचे महत्त्व आणि अंमली पदार्थांपासून दूर राहण्याचा सामाजिक संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यात आला. 'स्त्री शक्ती' या संकल्पनेद्वारे महिलांच्या सशक्तीकरणावर विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन एनसीसी विभागाने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने यशस्वीरित्या पार पाडले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे तथा डॉ. हरिश्चंद्र पतंगे, पर्यवेक्षिका प्रा. वंदना बदने, लेफ्टनंट डॉ. रामराज गावंडे, डॉ. अजय गव्हाणे, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील, पोलीस कॉन्स्टेबल काशिनाथ कारखेडे यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व नागरिक उपस्थित होते.

## ग्राम महसूल अधिकारी संतोष अस्कुलकर यांना जोमेगाव ग्रामस्थांच्यावतीने निरोप



**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील जोमेगाव येथे ग्राम महसूल अधिकारी संतोष अस्कुलकर यांची नांदेड तहसीलमध्ये बदली झाली. त्यानंतर जोमेगाव ग्रामस्थांच्यावतीने त्यांचा दि. २९ रोजी सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मंडळ अधिकारी चंद्रशेखर सहारे, ग्राम महसूल अधिकारी स्वाती येडे, सरपंच प्रतिनिधी नागोराव शिंदे, माजी सरपंच आदिनाथ शिंदे, ग्रामपंचायत सदस्य पंडित कापसे, पोलीस पाटील मारोती पांचाळ, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मारोती शिंदे, मनोहर भुरे आदींची उपस्थिती होती.

यावेळी नव्याने रुजू झालेल्या ग्राम महसूल अधिकारी स्वाती येडे, विठ्ठल ढेपे यांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते पोलीस पाटील मारोती पांचाळ यांनी सूत्रसंचालन केले.

## मंगरुळचे भूमीपुत्र योगानंद शिंदे यांची भारतीय सैन्यात निवड, ग्रामस्थांकडून सन्मान



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील मंगरूळ येथील योगानंद उर्फ हनमंत पंडीतराव पाटील शिंदे याची भारतीय सैन्यात निवड झाली आहे. भारतीय सैन्यात समावेश होणारा योगानंद हा मंगरूळ गावातील पहिलाच जवान ठरला आहे. प्रशिक्षणानंतर त्याचे गावात आगमन होताच रॅली काढून ग्रामस्थांनी सत्कार केला.

मंगरुळ येथील योगानंद शिंदे उर्फ हनमंत पंडीतराव पाटील शिंदे याची जिद्द, मेहनत व अभ्यासाच्या जोरावर भारतीय सैन्य दलामध्ये भरती झाली. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर गावात सुट्टीवर येताच मंगरुळ येथील गावकऱ्यांनी त्याची उघड्या जीपमधून मोटारसायकलला ताफा घेऊन लोहा ते मंगरुळ अशी रॅली काढली. त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयात आई-वडिलासह त्याचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच किरण हाके होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पांगरीचे माजी सरपंच तथा शिवसेनेचे (शिंदे) नांदेड दक्षिण तालुका संघटक, सुदाम राव पाटील बुद्रुक, लोहा तालुका खरेदी विक्री संघाचे उपसभापती श्याम अण्णा पवार, शिवसेना उबाठाचे लोहा - कंधार विधानसभा प्रमुख वसंतराव पाटील शिंदे, शिवसेना उबाठा चे लोहा दक्षिण तालुकाप्रमुख भीमराव पाटील शिंदे, शिवसेना उबाठा चे लोहा तालुका उत्तर तालुकाप्रमुख बालाजी गाडेकर, लोहा न.प.चे माजी नगरसेवक उत्तम महाबळे, विलास सावळे, शिवराज पाटील पवार, विनोद म हाबळे, एनएजीचे ब्लॉक कंमाडो गुणवंत जाधव, पांगरीचे चेअरमन मारोतराव पाटील बुद्रुक, विक्रांत पाटील बुद्रुक, बंटी पाटील बुद्रुक यांच्यासह मंगरुळ येथील गावकरी व लोहा तालुक्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## इनरव्हील क्लब नांदेडच्या अध्यक्षपदी मीनाक्षी पाटील व सचिवपदी डॉ. विद्या पाटील




**नांदेड (प्रतिनिधी)–** 'इनरव्हील' या महिलांच्या सामाजिक संस्थेच्या अध्यक्षपदी मीनाक्षी पाटील तर सचिव पदी डॉ. विद्या पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

नांदेडमध्ये ४१ वर्षांपासून इनरव्हील क्लब कार्यरत आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत नवनियुक्त अध्यक्षपदी सौ. मीनाक्षी पाटील तसेच डॉ.विद्या पाटील यांची सचिव पदी निवड झाली आहे. नवीन कार्यकारिणींमध्ये उपाध्यक्ष सौ. सोनाली देशमुख, खजिनदार सौ. मीनल रस्तोगी, आयएसओपदी नेहा पाथरीकर, संपादक म्हणून सौ. जिग्ना पटेल, सीपीसीपदी अंजली चौधरी, सीसी संगीता दंडे तर सहसचिव पदी सौ. कीर्ती सुस्तरवार यांची निवड झाली आहे.

तसेच कार्यकारिणी समितीमध्ये सौ. सुषमा काला, नीता दागडिया, सौ. कल्याणी हुरणे, डॉ. पुष्पा गायकवाड, सौ मीना मालीवाल व सौ. कृष्णा मंगनाळे, सौ. गायत्री तोष्णीवाल यांची निवड करण्यात आली आहे.

क्लबच्या वतीने यावर्षी निसर्ग संवर्धन, आरोग्य, शैक्षणिक जनजागृती, महिला सशक्तिकरण तसेच अनाथ अंध व वृद्धांच्या साठी उपयुक्त उपक्रम राबवले जाणार आहेत. अध्यक्ष मीनाक्षी पाटील आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी यापुढेही सामाजिक कार्याची ही वाटचाल अखंड सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

## श्री सुभाष रुरल को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.चे उद्घाटन



**हदगाव (प्रतिनिधी)–** श्री सुभाष रुरल सहकारी पतसंस्थेच्या प्रथम मुख्य शाखेचे गुरुवारी दि. २६ जून रोजी श्री सुभाष शुगर प्रायव्हेट लिमिटेड या साखर कारखान्याच्या परिसरात उद्घाटन करण्यात आले. सभासदांनी वृक्ष लागवड करून साखर कारखान्याचे चेअरमन सुभाषराव देशमुख यांचा वाढदिवसही साजरा केला.

दि.२६ जून रोजी श्री सुभाष शुगर प्रा.लि. हडसणी व शिऊर साखर कारखान्याचे चेअरमन सुभाष देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त कारखाना परिसरहात वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांच्या हक्काची सोसायटी श्री सुभाष रुरल को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. नांदेड च्या प्रथम मुख्य शाखेचे सुभाष देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी कार्यकारी संचालक सुशिलकुमार देशमुख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.


या कार्यक्रमास श्री सुभाष रुरल को-ऑप. क्रेडीट सोसायटीचे संचालक मंडळ, सभासद, शेतकरी बांधव, ऊसतोड वाहतुक ठेकेदार दोन्ही कारखान्यांचे जनरल मॅनेजर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमानंतर शिऊर साखर कारखाना वाकोडी येथे गाळप हंगाम २०२५-२६ च्या मिल रोलर पुजनाचा कार्यक्रम कारखान्याचे चेअरमन सुभाष देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व कार्यकारी संचालक सुशीलकुमार देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत वर्क्स मॅनेजर देविदासराव कराळे व त्यांच्या सुविधपत्नी यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमाला दोन्ही कारखान्याचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय





**दातांचं आरोग्य आपल्या एकूण शारीरिक आरोग्याचे द्योतक असतं. परंतु, काही सामान्य दैनंदिन सवयी दातांच्या आणि तोंडाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करू शकतात. काही सवयी आपल्या दातांच्या आरोग्यावर कसा परिणाम करू शकतात, याबद्दल जाणून घेणं महत्त्वाचं आहे. या सवयींबद्दल आपण अधिक जाणून घेऊया आणि त्यापासून बचाव कसा करावा, हे पाहूया...**



# दातांची कीड टाळता येईल?

**दातांच्या आरोग्याबाबत पालकांमध्येच फारशी जनजागृती नाही. त्यामुळे लहानपणापासून मुलांच्या दातांकडे दुर्लक्ष होते. साखर, गूळ, चॉकलेट, कॅन्डीसारख्या गोड पदार्थ खाण्याच्या सवयीमुळे पुढे जाऊन मुलांच्या दातांमध्ये कॅव्हिटी अर्थात कीड तयार होते आणि नंतर दातांचे दुखणे सुरू होते. त्यामुळे दातांच्या कीडेला रोखण्याचे नवे आव्हान उभे ठाकले आहे.**

चॉकलेट, गोळ्या, बिस्किटे खाणारी जिया एके दिवशी दात दुखत असल्याची तक्रार घेऊन तिच्या आईकडे रडू लागली. दात दुखताहेत म्हटल्यावर डॉक्टरांना दाखवावे लागले. डॉक्टरांनी तिच्या दातांची तपासणी केली. दातांमध्ये कॅव्हिटी जमा झाल्याचे निदान करीत त्यांनी कीड रोखण्याच्या उपाययोजना सांगितल्या. त्यावर डॉक्टर म्हणाले, बरे झाले तुम्ही जियाला लवकर घेऊन आलात; नाही तर तिच्या संपूर्ण दातांचे रूट कॅनॉल करायची वेळ आली असती... डॉक्टरांच्या या बोलण्याने जियाची आई घाबरली. पण त्यांना कारणे सांगितल्यावर त्या मात्र सावध झाल्या. हा प्रसंग पाहिल्यानंतर क्लिनिकमध्ये आलेल्या अनेक लहान मुलांच्या आई बाबांनी मुलांना गोड न खाण्याची भीती दाखवायला सुरुवात केली. दातांच्या आरोग्याबाबत मुलांसह पालकांमध्ये जागृती नसल्याने अशा तक्रारी डोके वर काढत असल्याचे दिसून आले.

## दातांना कीड कशी लागते?

दातांना कीड लागण्यामागे खरे कारण आहार होय. लहान मुलांच्या खाण्यात कॅल्शियमचे प्रमाण कमी असेल तर त्याचा दातांच्या वाढीवर परिणाम होतो. दातांची निगा कशी राखावी, दात कसे स्वच्छ करावेत, कोणत्या वर्षी दात येतात याबाबत पालकांना माहिती नसते. रात्री बाटलीतून दूध देण्याकडे पालकांचा अधिक ओढा असतो. त्या वेळी ते रात्रभर तोंडात साखर राहिल्याने कीड तयार होते. जे आपण खातो त्यात साखरेचे प्रमाण असते. साखर किंवा ग्लुकोज दातावर सातत्याने तसेच तोंडात राहतात. तोंडात मोठ्या प्रमाणात जीवाणू असतात. ते घातक नसले तरी त्या अन्नापासून आम्ल तयार होते. त्यामुळे दातांमध्ये कीड तयार होते. दाताच्या पहिल्या भागात कीड लागते. त्याला वेदना होत नाहीत. लक्षणे दिसत नाहीत. डेंटिनमध्ये कीड पोहोचल्यानंतर त्यामुळे दात दुखीची तक्रार सुरू होते, असे दातांचे डॉक्टर सांगतात. दातांना लागलेली कीड नसेपर्यंत जाते. त्यामुळे खूप तीव्र वेदना सुरू होतात. नसेतून दाताच्या खाली असलेल्या हाडामध्ये संसर्ग होण्याचा धोका असतो. त्यामुळे रुट कॅनॉल करावे लागते. दातावर दात लागणे, सूज येणे, जेवता न येणे अशा तक्रारी येतात, याकडे डॉक्टरांनी लक्ष वेधले.

### आहारात फळे भाज्या, सॅलेड हवे

लहानपणी फास्टफूड, जंक फूड, क्रीम रोल सारखे गोड पदार्थ खाल्ल्याने मुलांचे दात कीडतात. मुलांसह मोठ्यांच्या आहारात पालेभाज्यांसह फळभाज्या, फळे असायला हवीत. त्यामुळे नैसर्गिकरित्या दातांना आधार मिळतो. आहारात फळे भाज्या, सॅलेड असल्यास त्यामुळे दातांची कीड रोखण्यास मदत होते.

## पालकांमध्ये अज्ञान

दातांच्या आरोग्याबाबत पालकांमध्ये अज्ञान आहे. लहानपणापासून मुले गोड पदार्थ खाण्याकडे अधिक आकर्षित होतात. कोणतेही पदार्थ खाण्यापेक्षा ते खाल्ल्यानंतर दात स्वच्छ करणे गरजेचे असते. परंतु, अनेकदा लहान मुले त्याकडे दुर्लक्ष करतात. परिणामी, दातांच्या किडीच्या आजाराला सामोरे जावे लागते. दाताची कीड आणि त्यामुळे होणारा जंतूसंसर्ग हा लक्षात घेणे आवश्यक आहे. प्रत्येक दाताला निसर्गाने एक संरक्षक कवच दिले आहे. दाताच्या पृष्ठभागावरील आवरणास 'इनॅमल' असे म्हणतात. केस किंवा नखाप्रमाणेच या कवचात रक्तवाहिन्या आणि नसतंतू नसतात. त्यामुळे या दाताच्या सर्वात वरील भागाला वेदना कळत नाही. त्याखालील भागाला 'डेंटिन' असे म्हणतात.



## कॅव्हिटी म्हणजे काय?

दंतरोग किंवा दाढदुखीचे सर्वात जास्त आढळणारे कारण हे दातांची कीड आहे. दात कीडणे म्हणजे दातांचे विघटन करणारा तोंडातील विशिष्ट जीवाणूंमुळे होणारा आजार आहे. काहीही खाल्ल्यानंतर दातांवरील खाचखळगे तसेच दोन दातांच्या फटीतील अन्न कण साफ केले गेले नाहीत. या कणांतील शर्करेवर तोंडातील जीवणू रासायनिक प्रक्रिया करतात. त्यातून तयार होणाऱ्या आम्लामुळे दातांच्या आवरणाचंचे चक्क विघटन करायला लागते. दाताला भोक पडायला लागते. त्याला 'कॅव्हिटी' अर्थात कीड असे म्हणतात, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.



## दातांची कीड कशी टाळावी?

- लहान मुलांना रात्री दूध बाटलीतून न पाजता चमच्याने पाजले पाहिजे.
- दूध पाजल्यानंतर चमच्याने पाणी पाजावे.
- १२ ते १३ व्या वर्षी दुधाचे दात पडतात. दुधाचे दात पडल्यानंतर दर सहा महिन्यांनी दातांची तपासणी करणे आवश्यक आहे.
- दातांच्या तपासणीतून दातांमध्ये कोठे कीड लागली किंवा काय हे कळते.
- तपासणीमुळे किडलेल्या दातांमध्ये त्या वेळी सिमेंट भरता येते.
- दात स्वच्छ करण्यासाठी बोटांचा किंवा कापडाचा वापर करावा.
- लहान मुले स्वतःहून दातांना ब्रश करीत नाहीत. त्यामुळे सहा ते आठ वर्षांपर्यंत मुलांचे दात पालकांनी स्वच्छ करावे लागतात. त्यानंतर पुढे पालकांनी मुलांच्या ब्रशिंगवर लक्ष ठेवणे आवश्यक असते.

# दातांचं दुखणं कायमचं थांबवण्यासाठी ७ गोष्टी

## खूप जास्त दाब देऊन दात घासणे


काही लोकांना सकाळी उठल्यावर ५ ते १० मिनिटे वेळ घेऊन, भरपूर दाब देऊन दात घासण्याची सवय असते. दात व्यवस्थित स्वच्छ व्हावेत म्हणूनच जोरात घासले पाहिजेत, असा त्यांचा विश्वास असतो. घासून झाल्यावर आरशात पाहून दात स्वच्छ झालेत का हेही ते तपासून पाहतात. पण खरं तर अशा प्रकारे जोरात दात घासणं धोकादायक ठरू शकतं. जोरात दात घासल्याने किंवा जास्त वेळ घासल्याने सर्व जंतू नष्ट होतात, असा समज चुकीचा आहे. प्रत्यक्षात तुम्ही दात घासायची पद्धतच महत्त्वाची असते. वरखाली किंवा एकाच बाजूने घासणं हे दातांना हानीकारक ठरतं. वर्तुळाकार हालचालीने, हळूवार दात घासले पाहिजेत. जास्त दाब दिल्यामुळे दातांवरील इनॅमल झिजू शकतात आणि हिरड्यांना त्रास होऊ शकतो. जर हे सतत झालं, तर कालांतराने हिरड्या झिजून दातांची मुळे उघडी पडायला लागतात. त्यामुळे दातांची संवेदनशीलता (सेन्सिटिव्हिटी) वाढण्याची समस्याही निर्माण होऊ शकते. २-३ मिनिटं दात घासणं पुरेसं आहे. पण एका दिवशी दोन वेळा दात घासावेत आणि वाटाण्याच्या दाण्याएवढी पेस्टदेखील पुरेशी आहे.

## कॉफी, चहा आणि शीतपेय पिणं

खूप लोक सतत सोडा, फळांचा रस, कॉफी, चहा किंवा शीतपेय पितात. त्यांच्या उच्च आम्लतेमुळे पांढरे दात हळूहळू खराब होतात. बाटलीमध्ये बंद असलेली शीतपेयं, कॉफी आणि चहा यामध्ये असलेली जास्त साखर, कॅफिन आदींमुळे पांढऱ्या दातांचे नुकसान होते. अत्यधिक सोडा असलेली शीतपेयं, कॉफी, चहा पिणे शरीरातील पाणी कमी करू शकते (डिहायड्रेशन). याचा परिणाम म्हणजे लाळ कमी होते. लाळ ही तोंडाच्या स्वच्छतेसाठी महत्त्वाची असते, ती दातांचे विकार आणि हिरड्यांचे आजार रोखते. ती कमी झाल्यास, केवळ दातांचे नुकसानच नाही तर पचनाच्या समस्या देखील उद्भवू शकतात. अशा प्रकारचे पेये पिऊन झाल्यावर तोंड स्वच्छ धुवून घेणं खूप महत्त्वाचं आहे. पाणी देखील जास्त पिऊन घ्यावे.

## दंतचिकित्सकांचा सल्ला न घेणं

दात दुखत असेल तरच दंतचिकित्सकाकडे जाऊन उपचार घेणं हा विचार चुकीचा आहे. जर आपल्या हाताचे हाड तुटले तर आपण त्यावर योग्य उपचारासाठी डॉक्टरांकडे जाऊन उपचार करतो. पण दातांचं मात्र असं नसतं. दातांचा कसाही वापर करा, जर शेवटी समस्या उद्भवली तर ते काढून कृत्रिम दात बसवून घेतले तरी चालेल, असा विचार लोक करतात. लोकांनी हे समजून घेणं आवश्यक आहे की, जर एक दात काढला तर कालांतराने त्याचा इतर दातांवरही परिणाम होईल. दात किडणे, हिरड्यांचे संसर्ग आणि तोंडाचा कर्करोग कोणत्याही लक्षणांशिवाय हळूहळू वाढू शकतो. फक्त दात घासणं किंवा स्वच्छ करणं पुरेसं नाही. कारण, दातांचे आरोग्य संपूर्ण शारीरिक आरोग्याचे संकेत आहे.



## उपकरण म्हणून वापर

दातांनी बाटलीचं झाकण उघडणं, दातांनी पाकिट फाडणं आणि नखं चावणं या सर्वांमुळे कालांतराने तुमच्या दातांचे मोठे नुकसान होऊ शकते. दात अन्न चावण्यासाठी असतात. हे समजून घेणं महत्त्वाचं आहे. दात हे कात्री, ब्लेड, कटर किंवा बाटली उघडण्याच्या उपकरणांचा पर्याय नाही. दातांचा वापर साधन म्हणून केल्याने त्याला तडे जाऊ शकतात आणि कधीकधी ते तुटू देखील शकतात. खूप लोकांना नखं चावण्याची सवय असते. त्यामुळं दातांचा आकार बदलू शकतो. जास्त दाब देऊन नखं चावल्याने जबड्याचेही नुकसान होऊ शकते.

## वारंवार खात राहणं

सतत काहीतरी खात राहिल्याने, पातळ अन्नकण दातांमध्ये अडकून राहतात. त्यामुळे बॅक्टेरियाची वाढ झपाट्याने होते. यामुळे दातांमध्ये पोकळी आणि



भेगा निर्माण होण्याचा धोका वाढतो. काही पिऊन झाल्यानंतर तोंड धुणं खूप महत्त्वाचं आहे. जास्त साखर ही केवळ शरीराच्या इतर भागांसाठीच नव्हे, तर दातांसाठीही धोकादायक आहे. खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यावं किंवा माउथवॉशने तोंड स्वच्छ करावं.

## दात कुरकुरणे, दात खाणं

राग आला की दात घट्ट चावणे किंवा दात खाणं हे सामान्य आहे, पण यामुळं दातांची निश्चितच हानी होते. तणाव, मानसिक दडपण यांसारख्या मानसिक कारणांमुळेही दात कुरतडण्याची किंवा खाण्याची सवय लागू शकते. काही लोक झोपेतसुद्धा दात कुरतडतात किंवा खातात... त्यामुळं दात कमकुवत होतात. त्यांचा आकार आणि स्वरूप बदलतो. दातांमध्ये संवेदनशीलता वाढते, दातदुखी जाणवते. त्यामुळे जबड्यातही वेदना होऊ शकतात. एका टप्प्यावर तोंड उघडणं किंवा बंद करणं सुद्धा वेदना निर्माण करू शकतं. दंततज्ज्ञांचा सल्ला घेऊन डेंटल नाईटगार्ड वापरणं हा एक उपाय ठरू शकतो.

## धूम्रपान, तंबाखूचा वापर

धूम्रपान करणाऱ्यांना तोंड द्यावी लागणारी पहिली समस्या म्हणजे दातांवर डाग पडणे. त्यानंतर, तोंडाची दुर्गंधी, हिरड्या कमकुवत होणं आणि तोंडाच्या कर्करोगाचा धोका वाढतो. धूम्रपान किंवा तंबाखू सेवनामुळं दात गमावण्याची स्थिती देखील निर्माण होऊ शकते. परंतु, उपचार घेतल्यानंतरही धूम्रपान करणं हे उपचारांच्या परिणामांना मर्यादा घालेल. तंबाखूचे सेवन किंवा धुम्रपान सोडल्याने तोंडाची स्वच्छता आणि एकूण आरोग्यात मोठ्या प्रमाणात सुधारणा होते.

# जपा दातांचे आरोग्य!

**आरोग्य चांगलं राहावे म्हणून योग्य आहार, नियमित व्यायाम आणि पुरेशी झोप या बाबी आवश्यक असल्या तरी दातांचे आरोग्य चांगले नसेल तर इतर सर्व पथ्य पाळूनही शरीराला व्याधी जडू शकतात. त्यामुळे दातांची सुरक्षा अन् सुरक्षेसाठी दातांचे विकार होऊ नयेत म्हणून घ्यावयाची काळजी अत्यंत महत्त्वाचा विषय आहे.**

साधारणपणे दातांचे विकार दोन प्रकारचे असतात. हार्ड टिश्यू (दात) आणि सॉफ्ट टिश्यू (प्रामुख्याने हिरड्या, ओठ, जीभ, इपिथेलियम म्हणजे तोंडाची त्वचा). यातील हार्ड टिश्यूचे विकार म्हणजे कीड, झीज, दात तुटणं तर सॉफ्ट टिश्यूचे विकार म्हणजे हिरड्यांना सूज येणं, तोंड येणं आणि मौखिक कॅन्सर. दातांचे काम म्हणजे चर्वण, काही शब्दांचे उच्चार आणि गाल, ओठ यांना आधार देऊन चेहऱ्याला योग्य आकार देणं. याखेरीज दुधाच्या दातांचे काम असते पक्क्या दातांकरता पाया तयार करणं. दुर्दैवाने दुधाचे दात पडणारच असतात. त्यामुळे त्या दातांच्या उपचारांपेक्षा ते काढून टाकण्याकडे आपला कल असतो. आता हे दुधाचे दात (जे वेगवेगळ्या वयात पडतात) वेळेआधी पडले तर बाकीचे दात मोकळ्या जागेत सरकण्याची शक्यता असते (हीच शक्यता पक्का दात पडला, काढला आणि बसवला नाही तरी पण असते). अजून एक म्हणजे वयाच्या सहाव्या वर्षी येणाऱ्या दाढा या पक्क्या असतात. पण या आधी दुधाचे दात पडत नसल्याने हादेखील दुधाचाच दात आहे, असं आपल्याला वाटतं. त्यामुळे याही दाताकडे आपलं दुर्लक्ष होतं. हा दात अन्न चावण्याचं काम इतर दातांपेक्षा जास्त प्रमाणात (जवळ जवळ ६०%) करतो. त्यामुळे अगदी लहानपणापासून वर्षातून दोनदा दातांची तपासणी व्हायला हवी.

- एखाद्या दाताला कीड असली तर तो दात भरता येतो (fillings), हीच कीड खोलवर असली तर दंतनलिकोपचार (रुट कॅनॉल ट्रीटमेंट) करून दातावर कॅप लावण्याचा सल्ला दिला जातो.
- लहान मुलांमध्ये बाकीचे दात मध्ये सरकू नये म्हणून स्पेस मेंटेनर बसवले जातात तर ज्यांची वाढ पूर्ण झाली आहे, अशाना कृत्रिम दंतरोपणाचा (ब्रिज किंवा इम्प्लाण्ट) सल्ला दिला जातो.
- पाया (दातांचा आधार- हिरड्या) मजबूत नसेल तर हिरड्यांना सूज येऊन त्यातून रक्त आणि कालांतराने पू वाहणं आणि आधाराच्या हाडांची झीज होऊन दात हलायला लागतात.
- दात स्वच्छ करणं (scaling) आणि इतर उपचार करून यातून मार्ग काढलाय जातो. या उपचारांची गरज पडू नये म्हणून दात टूथब्रशच्या मदतीने स्वच्छ करावे. प्रत्येक वेळेस खाल्ल्यानंतर खळखळून चुळा भराव्यात.

### स्पोर्ट्स डेंटिस्ट्रीबद्दल...

खेळाडूंना दातांना मार लागण्याची शक्यता १३-३९% असते, हे टाळण्याकरता माऊथ गार्ड अथवा मास्क वापरणं गरजेचं असतं. दात तुटला तर त्यावर उपचार करता येतातच. पण निखळलेला दात बसवणं पण शक्य असतं. पडलेला दात पाण्यात किंवा दुधात ठेवून लवकरात लवकर डॉक्टरांकडे जावं.

- कधी-कधी दातांची घडण अशी असते की काळजी घेऊनही अन्नकण अडकतातच. अशा दातांची सीलंट ट्रीटमेंट केली जाते. लहान मुलांच्या दातांना फ्लुओराइड ॲप्लिकेशन करणं फायद्याचं ठरू शकतं. बऱ्याच रुग्णांची दातांची ठेवण वेडीवाकडी असते. यामुळेही त्रास होतो.
- कधी कधी मुले बोट, अंगठा, ओठ चोखतात. ज्यामुळे दातांची रचना बदलू शकते. तसंच काही मुलं तोंडाने श्वास घेतात. त्यामुळे तोंड उघडं राहून दात कीडण्याचे प्रमाण वाढते. अशावेळी डॉक्टरांचा सल्ला घेणं योग्य.
- मुख्य आपला आहार चौरस असावा. तुटलेले दात, नीट न बसणारे कृत्रिम दात, तंबाखू, सुपारी यासारख्या घातक सवयींमुळे तोंडात जखमा होतात. यावर उपचार करून घेणं आणि हे घातकपदार्थ सेवन न करणं हे यावरचे उपाय आहेत.

# घरकुलासाठी पाच ब्रास वाळू -महसूल मंत्री

**मुंबई (प्रतिनिधी) –** राज्य शासनाने राज्यात एक व्यापक वाळू धोरण लागू केले आहे. या धोरणाअंतर्गत घरकुलांसाठी स्थानिक वाळू घाटांमधून पाच ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तहसीलदारांमार्फत ही वाळू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवली जाणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत दिली.

विधानपरिषद सदस्य सर्वश्री दादाराव केचे, शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.

वर्धा जिल्ह्यातील देऊरवाडा येथे अवैध वाळू साठ्याचा तपास केला होता. त्यानंतर संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, मोठ्या प्रमाणात साहित्य जप्त करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या साहित्यांमध्ये नदीतून चोरटी वाळू काढण्यासाठी वापरले जाणारे लोखंडी ड्रम, पाईप, चाळण्या, टोपले आदींचा समावेश आहे. या प्रकारावर कारवाई करताना संबंधित व्यक्तींना अटक करण्यात आली असून, शासनाच्या सूचनेनुसार दोषी तलाठी व महसूल निरीक्षकांना निलंबित करण्यात येणार असल्याचेही महसूल मंत्र्यांनी यावेळी सांगितले.

शासनाने वाळू चोरी रोखण्यासाठी आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात एम.सी.आर.डी.ओ. धोरण लागू करून प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर युनिट्स सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे नैसर्गिक वाळूवरील अवलंबित्व कमी होईल आणि वाळूचा तुटवडा कमी करून काळाबाजाराला आळा बसेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

स्थानिक ग्रामपंचायती, नगरपंचायती व खासगी बांधकामांसाठी देखील ठराविक दराने वाळू उपलब्ध करून देण्याची योजना असल्याचे सांगून महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, या सर्व प्रक्रियेचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले असून, हे पोर्टलमार्फत पारदर्शकपणे राबवले जाणार आहे.

गृह व महसूल खात्यांनी संयुक्त निर्णय घेतला आहे की, वाळू चोरीसंदर्भात महसूल किंवा पोलीस यांपैकी कोणाकडेही गुन्हा दाखल झाला असेल तरी दोन्ही विभाग हे संयुक्त कारवाई करतील, असे बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

# अरबी समुद्रात तेलवाहक जहाजाला आग, भारतीय नौदलाने १४ जणांना वाचवले

**मुंबई (प्रतिनिधी) –** अरबी समुद्रात 'एमटी यी चेंग' नावाच्या तेलवाहक जहाजाला आग लागली. भारतीय नौदलाने आग लागल्याची माहिती मिळताच तातडीने मदतकार्य सुरू केले. 'एमटी यी चेंग'वर असलेल्या १४ क्रूंना वाचवण्यात आले. यात आठ खलाशी आणि सहा अधिकारी आहेत. जहाजावरील सर्व जण सुरक्षित आहेत. वैद्यकीय पथकाने त्यांची तपासणी करुन सर्व क्रू सदस्य सुखरुप असल्याचे सांगितले. आयएनएस तबर घटनास्थळाजवळ उपस्थित आहे.



भारतीय नौदलाने तातडीने कारवाई केली आणि जहाजाला लागलेली आग विझवली. यामुळे समुद्रात संकटात सापडलेले जहाज वाचले.

प्रशांत (पॅसिफिक) महासागरातील पलाउ हा छोटा देश आहे. पलाउ फिलिपाईन्सच्या पूर्वेला ८०० किमी व जपानच्या दक्षिणेला ३२०० किमी अंतरावर आहे. या देशाचा ध्वज असलेली 'एमटी यी चेंग' नावाची तेलवाहक नौका अरबी समुद्रातून प्रवास करत होती. या प्रवासादरम्यान तेलवाहक जहाजाला आग लागली. आग लागल्यामुळे जहाजावरील विजेचा पुरवठा ठप्प झाला. भारतीय नौदलाने तातडीने मतकार्य सुरू केले. या मदतीमुळे जहाज आणि जहाजावरील क्रू सुरक्षित आहे. आग विझविण्यात आली आहे. आयएनएस तबरवरील नौसैनिक आणि 'एमटी यी चेंग' जहाजावरील अधिकारी – कर्मचाक्षवयांनी संयुक्त कारवाई करुन जहाजाच्या इंजिन रूमला लागलेली आग विझवली.'एमटी यी चेंग' या तेलवाहक जहाजावरील सर्व १४ अधिकारी – कर्मचारी हे भारतीय वंशाचे आहेत. भारतीय नौदलाने या सर्वांना वाचवले आहे.

# महाराष्ट्रात स्मार्ट प्रीपेड नाही, स्मार्ट पोस्टपेड मीटर -मुख्यमंत्री

**मुंबई (प्रतिनिधी) –** मुंबई : महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेडने दिलेल्या माहितीनुसार राज्यात स्मार्ट प्रीपेड नाही तर स्मार्ट पोस्टपेड मीटर आहेत. विधानसभेत वीज मीटर संदर्भात एक तारांकीत प्रश्न आला होता. या प्रश्नाला उत्तर देताना राज्यात विजेचे स्मार्ट प्रीपेड नाही स्मार्ट पोस्टपेड मीटर आहेत. या मीटरच्या मदतीने बिलिंग केले जाते, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आतापर्यंत २८ हजार २०२ वाहिन्यांवर स्मार्ट माटर बसविले आहेत. राज्यात आतापर्यंत ४ लाख ७ हजार ५०७ पैकी १ लाख ४० हजार ५६१ रोहित्रांना (ट्रान्सफॉर्मर) स्मार्ट मीटर बसविले आहेत. राज्यातील २ कोटी २४ लाख ८८ हजार ग्राहकांपैकी ३२ लाख २३ हजार ग्राहकांनी स्मार्ट मीटर बसवून घेतली आहेत. ही सर्व स्मार्ट प्रीपेड नाही स्मार्ट पोस्टपेड मीटर आहेत; अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

स्मार्ट पोस्टपेड मीटर रिअल-टाइम डेटा पुरवतात. यामुळे नेमकी किती वीज वापरली याची अचूक आकडेवारी कंपनीला आणि ग्राहकाला मिळते. या आकडेवारीआधारे योग्य ते बिल ग्राहकाला आकारले जाते. चेक, थेट खात्यात ऑनलाईन ट्रान्सफर अथवा युनिफाईड पेमेंट सर्व्हिस अर्थात यूपीआयच्या मदतीने ग्राहक बिलाचा भरणा कंपनीला करू शकतात.

# पंढरपूर वारीदरम्यान मृत्यू झाल्यास वारकऱ्याला ४ लाखांची आर्थिक मदत; शासनाचा निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी) –** यंदा महाराष्ट्र सरकारने वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. वारीदरम्यान १६ जून ते १० जुलैदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अपघातात वारकऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना सरकारकडून चार लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. यासंदर्भातलं नवं परिपत्रक महसूल विभागाने मंगळवारी जाहीर केले आहे.

या निर्णयामुळे वारीदरम्यान घडणाऱ्या अनपेक्षित घटनांमध्ये वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळणार आहे. १६ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत वारीदरम्यान जर एखाद्या वारकऱ्याचा



अपघात, विषबाधा किंवा इतर नैसर्गिक कारणामुळे मृत्यू झाला, तर त्यांच्या कुटुंबीयांना ही रक्कम मिळणार आहे. मात्र आत्महत्येच्या घटनांमध्ये ही मदत लागू होणार नाही. याशिवाय, वारीदरम्यान अपघातामुळे अपंगत्व आल्यास देखील आर्थिक मदतीची तरतूद आहे.

अपघाताने व दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या निकटच्या वारसदारांस ४ लाखांची मदत वारीदरम्यान अपंगत्व आलेल्या वारकऱ्यांना ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास ७४ हजार रुपये, ६० टक्क्यांवरून अधिक अपंगत्व आल्यास २.५० लाख रुपये देण्यात येणार आहेत. तसेच एका आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी इस्पीतळात दाखल झाल्यास १६००० रुपये तर एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीसाठी दाखल असल्यास ५४०० रुपयांची मदत दिली जाणार आहे.

शासनाच्या परिपत्रकानुसार, पंढरपुरातील विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांकरता वारी सुरू झाल्याच्या दिनांकापासून म्हणजेच १६ जून ते १० जुलैदरम्यान, अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यू झालेल्या तसेच जखमी झालेल्या वारकऱ्यांसाठी मदतीची तरतूद करण्यात आली आहे. आत्महत्या विषबाधा खून वगळून इतर नैसर्गिक मृत्यू अपघाताने झालेल्या दुर्घटनांमध्ये ही आर्थिक मदत दिली जाईल.

# करन्सी नोट प्रेसच्या भरती परीक्षेत डमी उमेदवार

## बिहारच्या सात जणांविरोधात गुन्हा दाखल

**नाशिक (प्रतिनिधी) –** येथील करन्सी नोट प्रेसमध्ये झालेल्या भरती प्रक्रियेत धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या परीक्षेत काही उमेदवारांनी फसवणूक करून, डमी परीक्षार्थी बसवून आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे नोकरी मिळविल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पवई पोलीस ठाण्यात सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्व आरोपी मूळचे बिहार राज्यातील रहिवासी आहेत.

करन्सी नोट प्रेसमध्ये कनिष्ठ टेक्निशियन (मुद्रण/नियंत्रण), कनिष्ठ टेक्निशियन (कार्यशाळा/इलेक्ट्रीकल) आणि पर्यवेक्षक या पदांसाठी १३ मार्च २०२२ ते ४ मार्च २०२३ या कालावधीत भरती परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत सात जणांनी संगनमत करून डमी परीक्षार्थींना परीक्षा केंद्रावर पाठवले. या डमी उमेदवारांनी त्यांच्या जागी परीक्षा दिली आणि उत्तीर्णही झाले.

परीक्षा पास झाल्यानंतर, आरोपींनी बनावट आयटीआय प्रमाणपत्रे आणि विद्युत अभियांत्रिकीतील (इलेक्ट्रीकल) डिप्लोमाची बनावट कागदपत्रे सादर करत नोकरी मिळवली. या फसवणुकीचा प्रकार नाशिकमध्ये उघडकीस आल्यानंतर प्रकरण झिरो एफआयआरच्या स्वरूपात मुंबईतील पवई पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आले.

# सीसीएमपीचा कोर्स पूर्ण केलेल्या डॉक्टरांची होणार वैद्यक परिषदेच्या पुस्तकात नोंदणी

## राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांना दिलासा; एमएमसीचा निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य वैद्यक परिषदेने मोठा निर्णय घेतला आहे. मॉडर्न फार्माकोलॉजीचा अर्थात सीसीएमपीचा कोर्स पूर्ण केलेल्या राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांची नोंदणी आता महाराष्ट्र राज्य वैद्यक परिषदेच्या नोंदणी पुस्तकात होणार आहे. यामुळे राज्यातील एक लाख होमिओपॅथी डॉक्टरांना दिलासा मिळाला आहे.

यापूर्वी होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी औषधांची प्रॅक्टिस करण्याची परवानगी नव्हती. मात्र राज्य सरकारने या डॉक्टरांना आधुनिक फार्म्याकॉलॉजीचा एक वर्षाचा कोर्स पूर्ण केल्यानंतर ॲलोपॅथी औषधांची प्रॅक्टिस करण्याची परवानगी दिली आहे.

दरम्यान, या निर्णयाला इंडियन मेडिकल असोसिएशन ने विरोध केला होता. मात्र ३० जून रोजी महाराष्ट्र वैद्यक परिषदेने परिपत्रक काढत राज्यातील सीसीएमपी कोर्स पूर्ण केलेल्या डॉक्टरांची नोंदणी आता महाराष्ट्र वैद्यक परिषदेत होणार आहे. यामुळे राज्यातील लाखो होमिओपॅथी डॉक्टरांना दिलासा मिळाला आहे. मात्र या निर्णयाला इंडियन मेडिकल असोसिएशन विरोध करण्याची शक्यता नाकारता येत नाही. बाल वयात मेंदूची न्यूरो प्लास्टिसिटी सर्वाधिक असते, बाल वयात मेंदू लवचिक आणि विकसनशील अवस्थेत असल्यामुळे नवीन गोष्टी, नवीन भाषा शिकणे सोपे ठरते असे मत बाल मानसोपचार तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. मात्र, जसे जसे वय वाढत जाते मेंदूतील मज्जातंतू विकसित होण्याची गती कमी होते, त्यामुळे अल्प वयात नवीन गोष्टी, नवीन भाषा आत्मसात करणं वाढलेल्या वयापेक्षा जास्त सोपं ठरतं असं मत नागपूरचे प्रख्यात बाल मानसोपचार तज्ज्ञ डॉ. निखिल पांडे यांनी व्यक्त केले आहे.

# लैंगिक अत्याचार प्रकरणात 'एसआयटी' स्थापन करणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** बीड येथील अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली.

सदस्य चेतन तुपे यांनी यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वरिष्ठ महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली 'एसआयटी'ची स्थापना करून या प्रकरणाची कालबद्ध चौकशी करण्यात येईल. तसेच दोषींवर कठोर कारवाई करून दोषींना पाठीशी घालणाऱ्या सर्वांवरही कठोर कारवाई करण्यात येईल.


## Change In Name

My Old Name is KUBRA GOUHAR MD TAYYAB ALAM which now I am changing as New Name KUBRA GOUHAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.Address: H.N.1-8-654 BLOCK NO.15/215 LABOUR COLONY SHIVAJI NAGAR NANDED 431602 MO.9822714365












# विकसित महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने काम करणार -मुख्य सचिव कुमार

**मुंबई (प्रतिनिधी) –** महाराष्ट्र सर्व क्षेत्रात प्रगत राज्य आहे. राज्याचा मुख्य सचिव म्हणून २०४७ च्या विकसित महाराष्ट्र घडविण्याच्या संकल्पनेच्या दिशेने सर्वांच्या सहकार्याने काम करणार असल्याचे राज्याचे ४९ वे मुख्य सचिव राजेश कुमार यांनी सांगितले.

शासनाने राज्याच्या मुख्य सचिव पदी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार यांची नियुक्ती केली आहे. मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात मावळत्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडून त्यांनी पदभार स्वीकारला. यानंतर आयोजित कार्यक्रमात प्रशासकीय अधिकारी तसेच मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी यांच्यावतीने श्रीमती सौनिक यांचा तसेच वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त शाल, पुष्पगुच्छ, मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. तसेच नवे मुख्य सचिव राजेश कुमार यांचा शाल, पुष्पगुच्छ, देऊन स्वागत करण्यात आले. माजी मुख्य सचिव मनोज सौनिक, राजेश कुमार यांच्या पत्नी श्रीमती अर्चना राजेश कुमार आदी यावेळी उपस्थित होते. मुख्य सचिव राजेश कुमार म्हणाले, आपल्या मुख्य सचिव पदाच्या कालावधीत सर्व विभागांच्या सचिवांच्या सहकार्याने सर्वसामान्यांच्या जीवनामध्ये सकारात्मक बदल घडविण्यासाठी प्रयत्न करण्याला प्राधान्य दिले जाईल. सर्व क्षेत्रांमध्ये प्रगत असलेल्या महाराष्ट्राला अधिक उत्कृष्ट आणि नाविन्यपूर्ण कामाच्या माध्यमातून पुढे नेण्यासाठी सर्वांचे सहकार्य लाभेल, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## जाहीर प्रगटन

श्रीमती एस. ए. हरणे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, धर्माबाद यांचे न्यायालय दिवाणी किरकोळ अर्ज (आर. जे.ई.) क्र. १८/२०२५ पार्वती व इतर विरुध्द निरंक

अर्जदार : १) पार्वती भ्र लक्ष्मण कदम वय ४५ वर्ष, धंदा घरकाम २) साईनाथ पि लक्ष्मण कदम, वय २६ वर्ष, धंदा - शिक्षण, ३) संभाजी पि लक्ष्मण कदम, वय २० वर्ष, धंदा-मजुरी, तिघे रा. चोळाखा ता धर्माबाद जि नांदेड ४) लक्ष्मीबाई भ अनिल सूर्यवंशी वय ३० वर्ष, धंदा- घरकाम रा मोखंडी ता उमरी जि नांदेड

विरुध्द निरंक

गैरअर्जदार:

मयत -बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ नुसार अर्जदार यांना कायदेशीर वारसा प्रमाणपत्र Legal Heirship Certificate प्रदान करणे,

सदरील जाहीर प्रगटणाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यातआल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार हे मयताचे वारस असुन त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नसल्यामुळे त्यांना मयत लक्ष्मण संभाजी कदम यांचे निधन दिनांक २७.११.२०२२ रोजी झाले आहे आणि त्यांच्या मरणोपरांत मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम २ व ३ अन्वये हिअरशीप प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज त्यांचे वकील ॲड. सोनकांबळे ए. एम. यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरील प्रमाणपत्र हे शासकीय व खाजगी कामांसाठी आवश्यक असल्याबाबत नमुद केले आहे.

हे की प्रस्तुत प्रकरणात वरील बाबत कोणास काही आक्षेप, तक्रार अथवा उजर असल्यास त्यांनी त्याबाबतचे आपले म्हणणे सदरील जाहिर प्रगटन प्रकाशित झाल्यापासुन विहित मुदतीच्याआत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकारचा आ-क्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहित धरुन नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल. आज दिनांक ११ / ३ / २०२५ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानीशी दिला

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय क.स्तर धर्माबाद**

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर बिलोली यांच्या न्यायालयात,किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४१ /२०२५ पु.ता.५/८/२०२५

अर्जदार-१.सुमनबाई पि.लक्ष्मणराव जोशी वय-७६ वर्षे, व्यवसाय-घरकाम रा.येताळा ता.धर्माबाद जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार- १.मा.शाखाधिकारी भारतीय स्टेट बँक शाखा येताळा ता.धर्माबाद जि.नांदेड २.मा.उपजिल्हाधिकारी(भूसंपादन) पातलसिका क्र.२ नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

विषय - भारतीय वारसा कायमद कलम ३०२ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला असून अर्जदाराचे असे कथन आहे की,अर्जदार हे मयत कुसूमताई लक्ष्मणराव जोशी यांचे कायदेशीर वारस आहेत.अर्जदार हा मयत कुसूमताई लक्ष्मणराव जोशी यांची बहिण असून मयत कुसूमताई लक्ष्मणराव जोशी यांचा दिनांक ११/१२/२०१९ रोजी मृत्यू झाला.

मयत कुसूमताई लक्ष्मणराव जोशी यांचे गैरअर्जदार यांच्या शाखेत व कार्यालयात खालील तक्यामध्ये दर्शविलेले खाते क्रमांक मध्ये रक्कम जमा आहे.अनु.क्र.१मा.शाखाधिकारी भारतीय स्टेट बँक शाखा येताळा ता.धर्माबाद जि.नांदेड बचत खाते क्र.५२१९०२२७१२० मध्ये जमा रक्कम १,४८००० जमा आहेत.२मा.उपजिल्हाधिकारी(भूसंपादन) पातलसिका क्र.२ नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड---- जमा रक्कम २८१६८५+१०,१४,०७२=१२,९५,७५७ वरील तकत्यामध्ये दर्शविलेले रक्कम काढण्यासाठी अर्जदारास वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी,अर्जदारांनी मा.न्यायालयात मयत कुसूमताई लक्ष्मणराव जोशी यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत ३० दिवसात या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.आज दि.३० जुन, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली**

## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ११९/२०२५
गंगाबाई जाधव व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :-१.गंगाबाई भ्र.नारायण जाधव वय ६५ वर्षे, २.सुशिलाबाई नारायण जाधव वय ५० वर्षे,३.साहेब पि.नारायण जाधव वय २२ वर्षे वरील सर्व रा.चिंचाळा ता.बिलोली जि.नांदेड ४.माधुरी भ्र.शिवाजी निकम वय २५ वर्षे रा.मु.मारडी ता.मान जि.सातारा

विरूध्द -निरंक

विषय : वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत नारायण पि.व्यंकोबा जाधव अर्जदार क्र. १ व २ ह्या पत्नी आहेत. अर्जदार क्र.३ हा मुलगा व अर्जदार क्र.४ ही मुलगी आहे.मयत हे चिंचाळा ता.बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी होत्या.मयत नारायण पि.व्यंकोबा जाधव यांचा मुत्यू दिनांक २३/१०/२०२३ रोजी झाला.

मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही वारस नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे

हे की, मयत नारायण पि.व्यंकोबा जाधव यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक २२/०७/२०२५ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.आज दि.२४ जून, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधीताना या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मी खालील सही करणाऱ्यांनी नांदेड येथील तु. नांदेड पोट तु. नांदेड ता. व प. स. नांदेड, जि. व जि. प. नांदेड, नांदेड शहर, नांदेड वाघाळा महानगरपालिका हद्दीतील मौजे वाघाळा येथील शेत गट नबंर १३४ पैकी एक प्लॉट नं ५० आहे. ज्याची एकुण लांबी दक्षिण-उत्तर ४५ फुट म्हणजे १३.७१ मी. आहे. रुंदी पुर्व - पश्चिम ४० फुट म्हणजे १२.१९ आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ १८०० चौ. फुट म्हणजे १६७.२८ चौ. मी. आहे. ज्याची चतु:सिमा पुढील प्रमाणे आहे. पुर्वेस :- प्लॉट नं. ५१ आहे. पश्चिमेस :- प्लॉट नं. ४९ आहे, दक्षिणेस :- गट नं. १३४ चा भाग आहे. व उत्तरेस :- ३० फुट रुंद रोड आहे.

हे की, उपरोक्त वरील वर्णणांकीत प्लॉटच्या संदर्भाने विशेष कुल मुखत्यार श्री. गुट्टे संतोष नारायण, यांच्या कडून विकत घेण्याचा करार केला असून बयानापोटी काही रक्कमही दिली आहे. तरी माझ्या हक्कात लवकरच मा. दुय्यम निबंधक, नांदेड कार्यालयातुन नोदंणीकृत खरेदीखत करण्याचे ठरले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे वरील प्लॉटच्या वर्णणांकीत संदर्भाने कोणत्याही व्यक्तीचा आक्षेप अथवा उजर असल्यास अथवा कोणत्याही शासकीय, निमशासकीय, सहकारी, खाजगी वित्तसंस्थेस अथवा कोणत्याही व्यक्तीकडे गहाण अथवा तारण असल्यास संबंधितानी आपला आक्षेप लेखी स्वरुपात जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत नोदंवावा ०७ दिवसांच्या कालमर्यादेनंतर आलेला आक्षेप अथवा उजर ग्राहय धरण्यात येणार नाही किंबहुना माझ्यावर बंधकारक राहणार नाही, करिता प्रस्तूत जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात येत आहे.

**जाहिर प्रगटन देणार :-**
**श्री. बालाजी वैजनाथ जवादवार,**
**राहणार, रो-हाऊस नबंर -५, यमुना ए लाईन, राज पार्क, वेदांत नगर, मालेगाव रोड, तरोडा (बु.,) नांदेड पिन ४३१६०५. मो. ९६५७२५१६५७.**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# जूनमध्ये दोन हजार कारवाया, सात कोटींचा मुद्देमाल जप्त

## नांदेड परिक्षेत्रात पोलिसांची मोहीम सुरुच -शहाजी उमाप यांचा पुढाकार





**नांदेड (प्रतिनिधी)–** परिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध दारू, मटका, जुगार, ऑनलाईन लॉटरी, क्रिकेट बेटिंग, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, वाळू उपसा व वाहतूक अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींना आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दि. एक जूनपासून परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी अभियान सुरू केले आहे. मे महिन्यात राबविलेल्या अवैध व्यवसायविरोधी अभियान-१ दरम्यान, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या १७२१ इसमांचे विरुद्ध एकूण १५६१ केसेस करून ७ कोटी ७९ लाख ४७ हजार ४५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला होता.

सदर कारवाईनंतर, दि.१ जून पासून, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी अभियान-२ सुरू करण्यात आले होते. यादरम्यान, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या २ हजार ३१६ इसमांचे विरुद्ध एकूण २ हजार ०१७ केसेस करून ६ कोटी ९३ लाख ६० हजार ३६४ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करुन पोलीसांनी अवैध व्यवसायांचे विरोधात सुरू केलेली मोहीम आणखी तीव्र केली आहे. जून महिन्यात परिक्षेत्रातील नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली या चारही जिल्हयांनी चांगली कामगिरी आहे.

या कारवाई दरम्यान, नांदेड येथील स्थानिक गुन्हे शाखेने लोहा पोलीस ठाण्याचे हद्दीत गांजाची वाहतूक करताना दोन इसमांना पकडून त्यांचे कडून एकूण १४ लाख १३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सहायक पोलीस अधीक्षक, उपविभाग चाकूर यांनी पोस्टे अहमदपुर जि. लातूर हद्दीत १ कोटी ४६ लाख ९८ हजार रुपयांची वाळू जप्त करून चांगली कामगिरी केली आहे. सदर कामगिरी बाबत, पोलीस उपमहानिरीक्षक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

अवैध व्यवसायांत गुंतलेल्या (१९) इसमांना हिंगोली पोलिसांनी हद्दपार केले आहे. नांदेड पोलीसांनी हातभटटी दारु व्यवसायाशी निगडित एका इसमास महाराष्ट्र झोपडपटटीदादा, अवेध धोकादायक व्यक्ती आणि अंमली पदार्थ विक्रेत्यांविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई अधिनियम १९८१ (MPD) कायद्यांखाली एक वर्षासाठी स्थानबध्द करण्यात आले आहे. दि. १७ जून २०२५ रोजी त्याची रवानगी छत्रपती संभाजीनगर कारागृहात करण्यात आली आहे. परिक्षेत्रातील अवैध व्यवसायायिकांची यादी एकत्रित करण्यात येत असून, त्यांचेविरुध्द करावयाच्या कारवाईचे नियोजन सुरु आहे.

दि.१ जुलैपासून परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी 'अवैध व्यवसाय विरोधी अभियान-३' राबविण्यात येत आहे. संपूर्ण जुलै महिन्यात हे अभियान सुरु राहील. सदर मोहिमेदरम्यान अचानकपणे राबविण्यात येणाऱ्या किमान (४) मासरेडचा समावेश आहे. गुटखा बंदीसाठी व्यापक वाहन व साठवणूक ठिकाणांच्या तपासणीची मोहिम हाती घेण्यात येणार आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# अर्धापूर तालुक्यातील ४६ ग्रामपंचायत सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

## 'कहीं खुशी, कहीं गम' : २४ महिला सरपंच होणार

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील ४६ ग्राम पंचायतीच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत दि.१ रोजी तहसिलमध्ये गजानन मेटकर या बालकाच्या हस्ते चिठ्ठ्या टाकून काढण्यात आली. अनुसुचित जातीसाठी नऊ, अनुसूचित जमातीसाठी दोन तर नामाप्रसाठी बारा जागा राखीव आरक्षित करण्यात आल्या. एकूण ४६ सरपंचापैकी २४ जागेवर महिला सरपंच होणार आहेत.

आरक्षण सोडतीस उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ, तहसीलदार रेणुकादास देवणीकर, गटविकास अधिकारी दत्तात्रय कदम, नायब तहसीलदार सुर्यकांत ताडेवार, डॉ.एस.पी.गोखले आदींची उपस्थिती होती.

(अनुसूचित जाती राखीव) : देगाव कु., लोणी बु, खैरगाव म., निमगाव, (अनुसूचित जाती महिला राखीव) : मेंढला खु, कोंढा, चेनापूर, शेलगाव बू., गणपूर (अनुसूचित जमाती राखीव) : लहान, अनुसूचित जमाती महिला राखीव : भोगाव, ( नामाप्र ) : जांभरून, पाटनुर, उमरी, रोडगी, पिंपळगाव महादेव, कामठा बू. (नामाप्र महिला) : धामदरी, बामणी, पार्डी म.,बेलसर, मालेगाव, खैरगाव बु.खु., सर्वसाधारण : शेलगाव खु., दिग्रस नांदला, आंबेगाव, डौर, शेणी, देगाव बु. ,देळुब खु., चाभरा तांडा, लोणी खु., बारसगाव, सांगवी खु.खडकी, (सर्वसाधारण महिला राखीव) : दाभड, शहापूर, आमराबाद तांडा, सावरगाव, अमराबाद, सोनाळा, चाभरा, देळुब बु., चोरंबा, येळेगाव, पांगरी का., मेंढला बु. या प्रकारे आरक्षण सोडत संपन्न झाली.

# किनवटमधील ३२ ग्रामपंचायतींचे आरक्षण जाहीर

## सर्वसाधारण महिलांसाठी १०, पुरुषांसाठी ९

**किनवट (प्रतिनिधी)–** तालुक्यातील १३४ पैकी ३२ बिगर अनुसूचित क्षेत्रातील ३२ ग्रामपंचायतींचे दि.१ जाहीर करण्यात आले. ३२ पैकी १३ ग्रामपंचायती अनुसूचित जाती - जमातींसाठी राखीव आहेत.उर्वरित १९ पैकी सर्वसाधारण महिलांसाठी १०, तर पुरुषांसाठी ९ ग्रामपंचायती आहेत.

येथील तहसील कार्यालयात मंगळवारी सहायक जिल्हाधिकारी तथा नियंत्रण अधिकारी जेनिथ चंद्रा दोन्तुला, प्रभारी तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी बालाजी फोले,नायब तहसीलदार रामेश्वर मुंडे,सहायक महसूल अधिकारी डी.सी.भुरे,नरेश रोडे,मास्टर ट्रेनर मल्लिकार्जुन स्वामी,लिंबेश राठोड यांच्या उपस्थितीत कु.भाग्यश्री आमणर या विद्यार्थिनीने आरक्षणाच्या चिठ्ठ्या काढल्या. आरक्षण सोडतीत प्रवर्गनिहाय ग्रामपंचायती अशा : वाळकी बु. - अनुसूचित जाती,अप्पाराव पेठ, इरेगाव - अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती - निरंक, चिखली (इ) - अनुसूचित जमाती महिला, इस्लापूर, नंदगाव तांडा, फुलेनगर, कोसमेट - नागरिकाचा मागास प्रवर्ग, दयालधानोरा, नंदगाव, कंचली (इ),पांगरी, गोंडजेवली - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)तर मरकागुडा, मारलागुडा, मुळझरा, जरूर तांडा, मलकजाम तांडा, तोटंबा, मानसिंग नाईक तांडा, गोंडेमहागाव, अंबाडी तांडा व भिसी या ग्रामपंचायतींचे सरपंचपद सर्वसाधारण महिलांसाठी, तर रिठा, मलकजाम, पांगरपहाड, शिवणी, दिपला नाईक तांडा, मोहाडा, बुधवारपेठ, रोडानाईक तांडा, आंदबोरी या ग्रामपंचायतींचे सरपंचपद हे सर्वसाधारण पुरुषांसाठी आहे. आरक्षण सोडतीनंतर विविध ग्रामपंचायतींच्या भावी सरपंचांनी दावे - प्रतिदावे सांगितले आहेत.

# देगलुरात गुटखा माफिया जेरबंद, दोन वाहनही जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी यांच्या सूचनेवरून पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांनी गुटखा माफियांना अटक केली. तसेच गुटखा आणि दोन चारचाकी वाहने जप्त करण्यात आली आहेत.

गुन्हे शोध पथकाने अवैध धंद्याची माहिती काढीत कारची (एमएच१२ केएन ६०३९) तपासणी केली असता आरोपी शेख साजीद शेख जलाल बागवान (वय ३८), शेख अख्तर शेख गफार बागवान (वय ३३) दोघे रा. सदर बाजार जामा मस्जीदजवळ हिंगोली ता. जि. हिंगोली हे यांनी सुगंधीत विमल पान मसाला, सुगंधीत V-१ BIG TOBCCO, रजनिगंधा पानमसाला, Signature Finest पान मसाला असा एकुण ९ लाख २० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगीरी बद्दल अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव आणि संकेत गोसावी यांनी कौतुक करुन अभिनंदन केले आहे.



**नांदेड** : आ. रविंद्र चव्हाण यांची महाराष्ट्र भाजपा प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर नांदेड महानगर भाजपातर्फे महात्मा फुले पुतळ्यासमोर भर पावसात भाजपा कार्यकर्त्यांनी मिठाई वाटप करून फटाके वाजवत जल्लोष केला.

# अंबाडी घाटात बस-जीपच्या धडकेत; एक जण ठार

**किनवट (प्रतिनिधी)** – मांडवी उनकेश्वर मार्गावरील अंबाडी घाटात मंगळवारी दि.१ सकाळी एसटी बस आणि बोलेरो जीपची समोरासमोर धडक झाली. या भीषण अपघातात जीपचालक ठार झाला आहे.



किनवट आगाराची बस (एम.एच.१४-बीटी-२१०५) ही बस मांडवीमार्गे किनवटकडे येत होती. सदर बस अंबाडी घाटात येताच किनवटहून आदिलाबादकडे जाणाऱ्या बोलेरो जीपची ( क्र. एपी ०२- ६६६९) समोरासमोर धडक झाली. या अपघातात जीपचालक पप्पु गंगुलप्पा रा. चित्तूर, आंध्रप्रदेश हा गंभीर जखमी झाला. एसटी कर्मचारी व ग्रामस्थांनी जखमी जीपचालकाला बाहेर काढले. किनवट पोलिसांनी त्याला तातडीने आदिलाबादच्या सरकारी दवाखान्यात पाठविले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले.

# नशेच्या गोळ्या विकणाऱ्याविरुद्ध अभियान; शहराचे पावित्र्य सर्वांनी राखले पाहिजे -शहाजी उमाप

## शीख समाजाच्या शिष्टमंडळासोबत चर्चा

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहर ही पवित्र भूमि आहे. येथे श्री गुरु गोबिंदसिंघजी महाराज यांचा पावन वास्तव्य आहे. या धार्मिक स्थळाचे पावित्र्य राखणे सर्वांचे कर्तव्य आहे. नशा विकणाऱ्यांवर किंवा गुन्हेगारीला प्रोत्साहन देणाऱ्या विरोधात पाउले उचलण्यात येईल, असे आश्वासन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी शीख समाजाच्या शिष्टमंडळाला दिले.



मंगळवारी दुपारी संतबाबा बलविंदरसिंघजी करसेवावाले यांच्या शिष्टाईत एका शिष्टमंडळाने पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांची भेट घेऊन शहरात नशेच्या गोळ्या विकणाऱ्या मेडिकल स्टोर्सवर कडक कार्यवाही करण्याची मागणी केली. नांदेड शहरात विशेषता गुरुद्वाराच्या भोवती व काही रस्त्यांवरील मेडिकल स्टोर्सवर असले प्रकार घडत आहेत. असंख्य युवक व काही नशेडी प्रवृत्तीचे लोकं वेगवेगळ्या गोळ्यांचे सेवन करुन गुन्हेगारीला प्रोत्साहन देताहेत. पोलीस विभागाने अशा लोकांविरोधात कडक पाउले उचलावीत. पोलीस विभागाने जनते हेल्पलाइन सुरु करावी. संतबाबा बलविंदरसिंघजी, तेजपालसिंघ खेड, महेंद्रसिंघ, रविंद्रसिंघ मोदी, दीपकसिंघ हजुरिया, हैप्पीसिंघ रामगडिया, भगवंतसिंघ हजुरिया आदींनी यावेळी आपले मनोगत मांडले.

शिष्टामंडळाशी चर्चा करतांना शहाजी उमाप पुढे म्हणाले की, जनसंपर्कासाठी पोलीस विभागाच्या वेबसाइट संचालित आहेत. अशा गोष्टींना आळा घालण्यासाठी जनतेसाठी एक हेल्पलाइन आजच कार्यान्वित करण्यात येईल. तसेच एक वॉटस्अप्प नंबर सुद्धा देण्यात येईल. नशा विकणाऱ्या किंवा पोलिसांना काही माहिती द्यायची असल्यास त्याचा लाभ होईल. शिवाय माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल.

यावेळी चर्चेत नरेंद्रसिंघ ग्रंथी, गुलबिरसिंघ नवाब, विजयेंद्रसिंघ दफेदार, महादीप सिंघ महंत, जसप्रीतसिंघ होटलवाले सह वीस ते पंचवीस प्रतिनिधी उपस्थित होते.

# राजेश गायकवाड यांचे निधन

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – नरसी येथील रहिवासी राजेश मरिबा गायकवाड (वय ४०) यांचे दि. ३० जून रोजी निधन झाले.



त्यांच्यावर दि. १ रोजी दुपारी १२:३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, वडील, भाऊ, बहीण असा मोठा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते संजय गायकवाड मसलगेकर यांचे ते छोटे बंधू होत.

# शक्तीपीठ महामार्गा विरोधात मालेगावात शेतकऱ्यांचा रास्ता रोको

**मालेगाव (प्रतिनिधी)–** शक्तीपीठ महामार्ग विरोधात मालेगाव येथे बाधित शेतकऱ्यांनी मुला बाळांसह राष्ट्रीय महामार्गावर ठिय्या करीत दोन तासांपेक्षा जास्त काळ महामार्ग रोखला. विविध पक्षांचे प्रतिनिधी तसेच शेतकरी नेत्यांनी यावेळी बाधित शेतकऱ्यांना कुठल्याही परिस्थितीत माघार घेऊ नका, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत असे आश्वस्त केल्यामुळे आंदोलन तीव्र होण्याची चिन्हे आहेत.



शक्तीपीठ महामार्ग बाधित १२ जिल्ह्यांमध्ये मंगळवारी एकाच दिवशी रास्ता रोको करण्याचा शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीने निर्णय घेतला होता. त्यानुसार नांदेड जिल्ह्यामधील आंदोलन मालेगाव येथे झाले.

यावेळी शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथ पाटील, किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉम्रेड अर्जुन आडे, कामगार नेते कॉम्रेड प्रदीप नागापूरकर, राष्ट्रवादी शप पक्षाचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, राजू शेट्टी प्रणित स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमंत राजगोरे प्रहार जनशक्ती पक्षाचे विठ्ठल देशमुख, वंचित बहुजन आघाडीचे अविनाश भोसीकर, काँग्रेस पक्षाचे भोकर मतदार संघ प्रतिनिधी तिरुपती पाटील कोंडेकर, शिवसेना उबाठा गटाचे नागोराव पाटील इंगोले, शेतकरी नेते प्रल्हाद इंगोले आदींनी रास्ता रोको मध्ये सहभागी होत शक्तीपीठ महामार्ग विरोधात बाधित शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून सरकारने हा महामार्ग कायमचा रद्द करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी केली.

या आंदोलनात माजी जि. प. अध्यक्ष माणिकराव इंगोले शेतकरी संघटनेचे हरिभाऊ कदम, किशनराव कदम, शंकरराव राजे गोरे, मारोतराव भांगे, मधुकरराव राजेगोरे विविध शेतकरी नेत्यांची प्रमुख उपस्थिती होती. शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीची समन्वयक सुभाष मोरलवार, सतीश कुलकर्णी, गजानन तीमेवार, प्रमोद इंगोले, मारुती सोमवारी, कचरू मुधळ, शहानंद मुधळ, दिलीप भिसे, बालाजी इंगोले, भाऊराव इंगोले, देवानंद इंगोले, प्रदीप इंगोले, एकनाथ पाटील, तन्मय इंगोले व मालेगाव, धामदरी, देगाव कु. भोगाव, उमरी येथील बाधित शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# नांदेडच्या आरडीसी पदी किरण अंबेकर

## महेश वडदकर यांना 'रोहयो'





**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांचा कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच बदली करण्यात आली आहे. त्यांना नांदेडमध्येच रोहयो उपजिल्हाधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तर नांदेडचे नवे निवासी उपजिल्हाधिकारी म्हणून गोंदियाचे निवडणूक उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# नायगांव तालुक्यातील ८० ग्रामपंचायत सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** नायगाव पंचायत समिती कार्यालयात मंगळवारी दि. १ जुलै रोजी तालुक्यातील ८० गावांचे सरपंच पदाचे आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार डॉ. धमप्रिया गायकवाड, गट विकास अधिकारी संजय मिरजकर, नायब तहसीलदार विजय येरावार, चव्हाण, आलमवाड, भंडारे यांची उपस्थिती होती. अनेक गावात पूर्ववत जैसे थे आरक्षण असल्याचे दिसून आले आहे.

अनुसूचित जातीसाठी तलबीड, राजगड नगर, कोठाळा, पिंपळगाव, मुस्तापूर, गोदमगाव, सोमठाणा, खंडगाव तर अनुसूचित जाती महिला वर्गासाठी मुगाव, कहाळा बु. वंजारवाडी, चारवाडी, टाकळी तब, मरवाळी तांडा, खैरगाव, निळेगव्हाण, धुप्पा आणि अनुसूचित जमाती वर्गासाठी मरवाळी कोपरा, रातोळी व अनुसूचित जमाती महिलांसाठी होटाळा व रुई खुर्द आणि ना.मा प्र साठी कारला त. मा, माहेगाव, कुंटूर ईकळीमाळ, इज्जतगाव बु. टाकळी बु. दरेगाव, मनुर त. ब, बळेगाव, सांगवी, डोंगरगाव, महिला वर्गासाठी इकळीमोर, पळसगाव, टाकळगाव, शेळगाव छत्री, हिप्परगा जा. सुजलेगाव, बरबडा, राहेर, नरसी, बेळेगाव, सावरखेड, केदारवडगाव आणि खुल्ला प्रवर्ग टाकळी त. ब, धानोरा त. मा, सातेगाव, घुंगराळा, परडवाडी, कहाळा खु. सालेगाव कु. हंगरगा, लालवंडी, कोकलेगाव, कोलंबी, गडगा, पाटोदा त.ब, मांजरम, कृष्णुर, मोकासदरा, ताकबीड, बेटकबिलोली आणि खुला प्रवर्ग महिला यासाठी नरंगल, मांडणी, धनंज, नावंदी, रानसुगाव वजिरगाव, अंतरगाव, आंचोली, बेंद्री, टेंभुर्णी, कुंचेली गोळेगाव, नायगाव वाडी, हुस्सा, आलु वडगाव, शेळगाव गौरी, भोपाळा, रुई बु., देगाव, औराळा अशी सोडत झालेली आहे.

'माझ्या गावचा मीच सरपंच होणार' या अविर्भावात पांढरे शुभ्र कपडे घालून आलेले भावी सरपंच उमेदवारांच्या काही चेहऱ्यावर उदासीनता तर आरक्षणाची सोडत जैसे थे असल्याने अनेकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com